आज दिल्लीत कॉकरोच पार्टीच्या आंदोलनाबाबत अण्णांना काहीही बोलायचे नाही. त्यांच्या बाजूने उभे राहिलेला संघ तर याच सरकारात सामील आहे. त्याला न्याय वगैरेंचे काही पडलेले नाही. ते तेव्हाही नव्हतेच. काँग्रेसला नालायक ठरवणे हा एककलमी अजेंडा होता. कॉकरोच जनता पार्टीने सोशल मीडियामध्ये हवा निर्माण केली. पण, ही झुरळे त्याहून अधिक उंच उडू शकलेली नाहीत. त्यात त्यांच्या नेतृत्वाचा व इतर दोष असतीलही. पण, अण्णांच्या आंदोलनात संघ, केजरीवाल, मीडियाने हवा भरल्याने आणि सरकारने त्याला प्रतिसाद दिल्यानेच ते यशस्वी झाले होते हे ध्यानात ठेवायला हवे. याच गोष्टी नेमक्या झुरळांकडे नाहीत. समाजाची नियतही बदललेली आहे. नीटच्या परीक्षेबाबत संशय निर्माण व्हावा, अशा अनेक गोष्टी आहेत. सीबीएसईचे पेपर ऑनलाईन तपासण्याच्या निर्णयात तर सरळ सरळ भ्रष्टाचार दिसतो आहे. तिथे हे ऑनलाईन यंत्रणेचे कंत्राट एका बदनाम व काळ्या यादीतील कंपनीला देण्यात आले. काँग्रेसच्या काळात टूजी किंवा कोळसा खाणी वगैरेंबाबत नुसते आरोप झाले तर मंत्र्यांनी राजीनामे दिले. पुढे हे आरोप खोटे निघाले. एकाही प्रकरणात शिक्षा झाली नाही. आता धर्मेंद्र प्रधानांवर सज्जड आरोप होऊनही मोदींनी त्यांना संरक्षण दिले आहे. जनतेची नियतही बदललेली आहे. तिलाही मोदी कितीही भ्रष्ट आणि दुष्ट वागले तरी महानच वाटतात, असे होऊ लागले आहे. त्यामुळे झुरळांसारख्या प्रामाणिक आंदोलकांच्या मागे ती उभी राहत नाही. झुरळांच्या बाजूने लोकमताचा रेटा निर्माण होऊ शकत नाही. वास्तविक, नीटची परीक्षा हा तमाम सगळ्या बोलक्या मध्यमवर्गाचा जिव्हाळ्याचा विषय आहे. तिथे पेपर फोडून मूठभर लोकांना पास करण्याची भानगड झाली व गेली काही वर्षे असेच चालू होते असे बाहेर आले. तरीही या सरकारला जाब विचारायला हा मध्यमवर्ग तयार नाही. अण्णा हजारे हे याच लबाड, भाजपवादी आणि संधिसाधू मध्यमवर्गाला नेते वाटत होते. किंवा त्यांच्या डोक्यात तसे भरवले जात होते. आता सत्तेत येण्याचा उद्देश साध्य झाला. आता यांच्याच मुलांची डॉक्टर होण्याची स्वप्ने बरबाद झाली तरीही या मध्यमवर्गीय आईबापांचा भाजपचा लळा सुटत नाही. त्याला चार प्रश्न विचारावेत, असे त्यांना वाटत नाही. अण्णा आंदोलन हे संवेदनशील समाजाचे नव्हे तर, संवेदनशील सरकारचे लक्षण होते. झुरळांचे आंदोलन ज्या रीतीने अडचणीत चालू आहे ते समाजाचा आणि सरकारचा कोडगेपणा दाखवणारा आहे. अण्णांच्या आंदोलनाच्या काळात आपण न्यायासाठी लढतो आहोत, असे समाजाला वाटायला लावण्यात संघाचा परिवार आणि मीडिया यशस्वी झाले. आपण कायम न्यायाच्या बाजूला असतो असा एक भ्रम निर्माण करण्यात अण्णा व त्यांचे सहकारी यशस्वी झाले होते. झुरळांसोबत असले लोक नसल्याने गर्दी कमी आहे, पण त्यांचे आंदोलन अधिक सच्चे आहे.

---

विचार

# पर्यावरणाचा नव्हे, मानवी अस्तित्वाचाच प्रश्न

मिलिंद बेंडाळे

***तापमानवाढ, हिमनद्या वितळणे, समुद्राची वाढती पातळी, जंगलातील आगी किंवा जैवविविधतेचा ऱ्हास या घटना अनेकांना आपल्या दैनंदिन जीवनापासून दूर वाटत होत्या; मात्र गेल्या काही वर्षांमध्ये परिस्थिती पूर्णपणे बदलली असून हवामानबदल हा मानवी आरोग्य, अर्थव्यवस्था, अन्नसुरक्षा, जलसुरक्षा आणि सामाजिक स्थैर्याशी निगडित असलेला गंभीर जागतिक प्रश्न बनला आहे. भारतही त्याला अपवाद नाही.***

सध्या देशभरात पावसाचा धूमाकूळ अनुभवायला मिळत असला तरी भारतातील उन्हाळ्याची वाढती तीव्रता, विक्रमी उष्णतेच्या लाटा, अनियमित मॉन्सून, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, ढगफुटी, चक्रीवादळांची वाढती वारंवारता आणि दुष्काळाचे चक्र ही हवामानबदलाची ठळक उदाहरणे सर्रास पहायला मिळत आहेत. एकीकडे काही भाग पाण्याखाली जात आहेत, तर दुसरीकडे अनेक जिल्हे पाण्याच्या एका थेंबासाठी संघर्ष करत आहेत. ही विसंगतीच हवामानबदलाच्या गांभीर्याची जाणीव करून देते. सर्वात चिंतेची बाब म्हणजे या बदलांचा सर्वाधिक फटका मानवी आरोग्याला बसत आहे. जागतिक आरोग्य संघटना आणि विविध संशोधन संस्थांनी वारंवार इशारा दिला आहे, की हवामानबदल हे या शतकातील सार्वजनिक आरोग्यासमोरील सर्वात मोठ्या धोक्यांपैकी एक आहे. वाढत्या तापमानामुळे उष्माघात, हृदयविकार, मूत्रपिंडाचे विकार, निर्जलीकरण आणि श्वसनाचे आजार झपाट्याने वाढत आहेत. उन्हाच्या तीव्र लाटांमुळे दर वर्षी हजारो लोकांचा मृत्यू होत असल्याच्या घटना जगभर समोर येत आहेत. भारतासारख्या उष्णकटिबंधीय देशात ही परिस्थिती अधिक गंभीर आहे. शहरांमध्ये वाढते काँक्रीटीकरण, झपाट्याने कमी होणारी झाडे आणि उष्णता साठवून ठेवणाऱ्या इमारतींमुळे ‘अर्बन हीट आयलंड’चा परिणाम अधिक तीव्र होत आहे. दिवसभर तापलेले शहर रात्रीही थंड होत नाही. परिणामी वृद्ध, लहान मुले, गर्भवती महिला, रस्त्यावर काम करणारे मजूर आणि गरीब वस्त्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांचे आरोग्य अधिक धोक्यात येते.



हवामान बदलामुळे संसर्गजन्य आजारांचे स्वरूपही बदलत आहे. वाढलेले तापमान आणि आर्द्रता डासांच्या वाढीला पोषक ठरत असल्याने डेंगी, चिकुनगुनिया, मलेरिया आणि झिका यांसारख्या रोगांचा प्रसार नवीन भागांपर्यंत होत आहे. पूरस्थितीनंतर दूषित पाण्यामुळे जलजन्य आजारांचा उद्रेक होतो. बदलत्या हवामानामुळे अन्नधान्य उत्पादनावर परिणाम होत असल्याने कुपोषण आणि अन्नटंचाईसारख्या समस्याही अधिक गंभीर बनण्याची शक्यता आहे. वायूप्रदूषण आणि हवामानबदल हे मुद्दे एकमेकांशी घट्ट जोडलेले आहेत. जीवाश्म इंधनाचा वाढता वापर, वाहनांची वाढती संख्या, औद्योगिक उत्सर्जन आणि जंगलातील आगी यामुळे वातावरणातील प्रदूषण वाढत आहे. त्याचा परिणाम दमा, फुफ्फुसांचे विकार, हृदयविकार, कर्करोग आणि स्ट्रोकसारख्या आजारांच्या वाढत्या प्रमाणात दिसून येत आहे. भारतातील अनेक शहरे आज जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत आहेत. हे चित्र केवळ पर्यावरणीय नव्हे, तर आरोग्यविषयक आणीबाणीचे आहे. हवामानबदलाचा परिणाम मानसिक आरोग्यावरही होत असल्याकडे तुलनेने कमी लक्ष दिले जाते. नैसर्गिक आपत्तींमुळे घरदार गमावलेले लोक, शेतीचे नुकसान झाल्याने आर्थिक संकटात सापडलेले शेतकरी, रोजगार गमावलेले कामगार आणि सततच्या अनिश्चिततेत जगणारे नागरिक मानसिक तणाव, नैराश्य आणि चिंतेच्या गर्तेत सापडतात. हवामानबदलामुळे निर्माण होणारी असुरक्षितता सामाजिक अस्थैर्यालाही कारणीभूत ठरू शकते.

या संकटामागील सर्वात मोठे कारण मानवी विकासाचे विद्यमान मॉडेल आहे. औद्योगिकीकरण, अतिरेकी शहरीकरण, जंगलतोड आणि जीवाश्म इंधनावर आधारित अर्थव्यवस्था यामुळे हरितगृह वायूंचे उत्सर्जन अभूतपूर्व पातळीवर पोहोचले आहे. विकासाच्या नावाखाली सातत्याने होणारा निसर्गाचा ऱ्हास आज मानवालाच महागात पडत आहे. विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष नसून समतोल आवश्यक आहे, हे वास्तव आपण खूप उशिरा स्वीकारत आहोत. विशेष म्हणजे, हवामानबदलासाठी सर्वाधिक जबाबदार असलेले विकसित देश आणि त्याचे सर्वाधिक दुष्परिणाम भोगणारे विकसनशील देश यांच्यात मोठी विषमता आहे. औद्योगिक क्रांतीपासून प्रचंड प्रमाणात कार्बन उत्सर्जन करणाऱ्या राष्ट्रांची जबाबदारी अधिक असली, तरी हवामानबदलाचा सर्वाधिक फटका भारत, आफ्रिका आणि लहान बेट राष्ट्रांना बसत आहे. त्यामुळे हवामान न्यायाची संकल्पना आज अधिक महत्त्वाची ठरत आहे. भारताने नवीकरणीय ऊर्जेला प्रोत्साहन, हरित हायड्रोजन, इलेक्ट्रिक वाहने, कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि वृक्षलागवड यांसारख्या अनेक महत्त्वाच्या उपक्रमांना गती दिली आहे. सौरऊर्जा निर्मितीमध्ये भारताने उल्लेखनीय प्रगती केली आहे; मात्र देशाची वाढती लोकसंख्या, वेगाने वाढणारे शहरीकरण आणि ऊर्जा गरजा लक्षात घेता ही वाटचाल अधिक वेगाने करावी लागणार आहे. शहरांच्या विकासाचा पुनर्विचार करणे, हीही काळाची गरज आहे.

काँक्रीटच्या जंगलांऐवजी हरित क्षेत्रे वाढवणे, पावसाचे पाणी साठवणे, जलाशयांचे संरक्षण, नैसर्गिक नाले जपणे आणि सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य देणे या उपाययोजना आता पर्याय राहिलेल्या नाहीत; त्या अपरिहार्य बनल्या आहेत. प्रत्येक शहराने हवामानबदलाशी जुळवून घेण्यासाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे. कृषीक्षेत्रातही मोठे बदल अपेक्षित आहेत. बदलत्या हवामानाला तोंड देणाऱ्या पिकांच्या जाती, सूक्ष्म सिंचन, जलसंधारण, हवामानावर आधारित कृषी नियोजन आणि शेतकऱ्यांसाठी प्रभावी हवामान सूचना प्रणाली विकसित करावी लागेल. अन्यथा, अन्नसुरक्षेचे मोठे संकट निर्माण होऊ शकते. हवामान बदलावर नियंत्रण मिळवण्यासाठी शासनाच्या धोरणांइतकीच नागरिकांची भूमिकाही महत्त्वाची आहे. वीजेचा संयमी वापर, सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य, सायकल आणि पायी चालण्याची सवय, प्लास्टिकचा कमी वापर, कचऱ्याचे वर्गीकरण, पाण्याची बचत आणि वृक्षसंवर्धन या छोट्या वाटणाऱ्या कृतींचा मोठा परिणाम होऊ शकतो. पर्यावरण संरक्षण ही केवळ सरकारी यंत्रणांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची जीवनशैली बनली पाहिजे. त्यासाठी शालेय शिक्षणापासून पर्यावरण साक्षरतेला प्राधान्य देण्याचीही गरज आहे. हवामानबदल ही पुढील पिढीची समस्या नसून आजच्या पिढीचे वास्तव आहे, याची जाणीव लहानपणापासून निर्माण झाली पाहिजे. शाळा, महाविद्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, उद्योग आणि स्वयंसेवी संस्था यांनी संयुक्तपणे जनजागृतीचे व्यापक अभियान राबविणे आवश्यक आहे.

हवामान बदलाचा मुकाबला करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्यही तितकेच आवश्यक आहे. पॅरिस करारासारख्या जागतिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, हरित तंत्रज्ञानाचे आदानप्रदान, हवामान वित्त आणि विकसनशील देशांना आर्थिक व तांत्रिक मदत या बाबींना अधिक गती देण्याची गरज आहे. कारण हवामानबदलाला सीमा नाहीत, त्याचे परिणामही जागतिक आहेत. आजची वस्तुस्थिती अशी आहे, की हवामानबदल थांबवणे कदाचित शक्य नसले, तरी त्याचा वेग कमी करणे आणि त्याच्याशी जुळवून घेणे निश्चितच शक्य आहे. त्यासाठी विज्ञानाधिष्ठित धोरणे, राजकीय इच्छाशक्ती, उद्योगक्षेत्राची जबाबदारी आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग या चारही घटकांचा समन्वय आवश्यक आहे. पर्यावरणाचे नुकसान म्हणजे विकासाची किंमत ही विचारसरणी आता बदलावी लागेल. पर्यावरणाचे संरक्षण म्हणजेच आरोग्याचे संरक्षण, अर्थव्यवस्थेची सुरक्षा आणि भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित करणे होय. आज घेतलेले निर्णय पुढील अनेक दशकांचे भविष्य ठरवणार आहेत. म्हणूनच हवामानबदल हा केवळ वैज्ञानिकांचा किंवा पर्यावरण तज्ज्ञांचा विषय नसून प्रत्येक नागरिकाच्या अस्तित्वाशी निगडित प्रश्न आहे. वेळ अजूनही गेलेली नाही; मात्र ती वेगाने निसटत आहे. आजही आपण निसर्गाशी संघर्ष करण्याऐवजी सुसंवाद साधण्याचा मार्ग स्वीकारला, तरच भावी पिढ्यांना सुरक्षित, निरोगी आणि शाश्वत पृथ्वी देणे शक्य होईल. अन्यथा, हवामानबदलाची किंमत केवळ पर्यावरणालाच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीला चुकवावी लागेल.

गेल्या काही वर्षांमध्ये हवामानबदल हा केवळ पर्यावरणाचा विषय राहिलेला नाही, तर मानवी आरोग्याशी थेट निगडित असलेला गंभीर प्रश्न बनला आहे. वाढते तापमान, अनियमित पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा, वादळे आणि पूर यांसारख्या नैसर्गिक घटनांची तीव्रता सातत्याने वाढत आहे. या बदलांचा परिणाम केवळ शेती, अर्थव्यवस्था किंवा पर्यावरणावरच होत नाही, तर मानवी आरोग्यावरही त्याचे दूरगामी परिणाम होत आहेत. त्यामुळे हवामानबदलाकडे केवळ पर्यावरणीय संकट म्हणून न पाहता सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीनेही गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. जागतिक आरोग्य संघटनेने आरोग्य हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत मानवी हक्क असल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र, निरोगी आयुष्यासाठी स्वच्छ हवा, शुद्ध पाणी, सुरक्षित अन्न आणि संतुलित पर्यावरण या मूलभूत गरजा आहेत. हवामानबदलामुळे या सर्व घटकांवर विपरीत परिणाम होत असल्याने मानवी आरोग्य धोक्यात येत आहे.

---


चर्चा आजची

# पावसाळी पर्यटनात हुल्लडबाजी टाळा

वैभव पाटील

रायगडात आता मृगाच्या पावसाने चांगलाच जोर धरला. पहिल्या चरणात वरुणराजाने बऱ्यापैकी बरसात केलेली आहे. त्यामुळे आता जिल्ह्याला पावसाळी पर्यटनाचे वेध लागलेले आहे. पावसाळ्याच्या आगमनानंतर रायगड जिल्ह्यातील डोंगर-दऱ्या, हिरवागार निसर्ग आणि ओसंडून वाहणारे धबधबे पर्यटकांना खुणावू लागले आहेत. त्यामुळे वर्षा सहलीचे वेध लागले असून शनिवार-रविवार तसेच सुट्टीच्या दिवशी पर्यटनस्थळांवर पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. पावसाच्या सरींनी निसर्गाला नवचैतन्य लाभल्याने विविध निसर्गरम्य स्थळांवर पर्यटकांचा उत्साह ओसंडून वाहत आहे. धुक्याची चादर, हिरव्यागार दऱ्या, खळाळणारे धबधबे आणि गार वाऱ्याचा आनंद घेण्यासाठी कुटुंबीय, मित्रमंडळी तसेच तरुणाई मोठ्या प्रमाणात वर्षा सहलीचे नियोजन करत आहेत. पर्यटनस्थळांवरील हॉटेल्स, होमस्टे, रिसॉर्ट्स तसेच स्थानिक व्यावसायिकांनाही यामुळे आर्थिक चालना मिळत आहे.

यापूर्वी घडलेल्या अनेक दुर्घटनांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने गेल्या चार वर्षांपासून पावसाळी पर्यटनस्थळे असलेल्या ठिकाणी बंदी घातली होती. यावेळीही जिथे जिथे धबधबे आहेत, अशा धोकादायक पर्यटन ठिकाणांवर बंदी घालण्यात आली आहे. अलिकडच्या काही वर्षांत जिल्ह्यातील पावसाळी पर्यटनाला बहर आला आहे. दळणवळणाच्या दृष्टीने सोयीस्कर असल्याने गेल्या १५ वर्षात पर्यटकांची संख्या वाढली आहे. सह्याद्रीच्या उंच आणि रांगड्या डोंगररांगांनी वेढलेल्या व निसर्ग सौंदर्याने नटलेल्या रायगड जिल्ह्यात पावसाळी पर्यटन म्हणजे पर्यटकांना जणू पर्वणीच असते. जून महिन्यात पाऊस सुरू झाला की पर्यटक, निसर्गप्रेमींना वेध लागतात ते येथील धबधबे, वाहते पाण्याचे प्रवाह व धरणाच्या पाण्यात चिंब भिजण्याचे व मनसोक्त पावसाचा आनंद घेण्याचे. अनेकांची पावले आपोआप धबधबे, समुद्र किनारे, धरणे आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगांकडे वळतात. उंचावरून कोसळणारा पाण्याचा प्रवाह, धुक्याचे वातावरण हे सारे अनुभवण्यासारखे असते.



पावसाळ्यात येथील अनेक ठिकाणे पर्यटकांनी गजबजलेली असतात. काही दंगेखोर व अतिउत्साही पर्यटकांमुळे पर्यटनाला गालबोट लागते. बहुतांश ठिकाणी कलम १४४ देखील लावले जाते. मात्र गजबजाटापासून दूर काही वेगळे व सुरक्षित स्पॉट्स आहेत, जिथे पावसाळ्याचा पर्यटकांची हमखास गर्दी असते. पावसाळ्यातही पर्यटनाला येणार्यांची संख्याही लाखोंच्या घरात असते. उत्साहाच्या भरात काही पर्यटक नियम व कायदे धाब्यावर बसवतात. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. पावसाळ्यात पर्यटक धबधब्यावर जाणे पसंत करतात. यामध्ये प्रामुख्याने अलिबाग तालुक्यातील सिद्धेश्वर, तिनवीर धरण, पनवेल तालुक्यातील देहरंग, गाढेश्वर धरण, कर्जतमधील आषाणे, सोलनपाडा खालापूर तालुक्यातील झेनिथ, माणगाव तालुक्यातील देवकुंड, ताम्हाणी घाटातील धबधबे आदींचा समावेश आहे. या ठिकाणी आतापर्यंत अनेक दुर्घटना घडलेल्या आहेत. या ठिकाणी पर्यटक मद्यपान करून धिंगाणा करतात. मुलींची छेडछाड, पाण्यात खोलवर जाणे असे प्रकार घडत असतात. यामुळे अनेक दुर्घटना घडतात. काहींना आपले प्राण गमवावे लागले आहेत. पर्यटकांना सुरक्षा मिळावी, कोणताही अपघात होऊ नये, दुर्घटना घडू नये यासाठी रायगड जिल्हा प्रशासन लक्ष ठेवण्याच्या सूचना विभागांना देते. दरवर्षी प्रशासन प्रतिबंधात्मक उपाययोजना करते. जिल्ह्यात सर्वत्र आपत्तीच्या दृष्टीने धबधब्यांच्या ठिकाणी मद्यपान करण्यास मनाई करण्यात येते. असे असले तरी पर्यटकांकडून त्याचे सर्रासपणे उल्लंघन होताना दिसत आहे.

धोकादायक पर्यटनस्थळांवर जाण्यापेक्षा जिल्ह्यातील सुरक्षित धबधबे, ओढे व धरणे येथे पावसाळी पर्यटनासाठी नागरिक पसंती देतात. येथील धरणांच्या ओसंडून वाहणाऱ्या पाण्यात मौजमजा घेण्यासाठी पर्यटक गर्दी करत आहेत. रविवारी व सुटीच्या दिवशी मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात. थोडी खबरदारी व अतिउत्साह टाळल्यास कुटुंब सहली, तरुणाई बरोबरच लहान मुलांसाठीही ही ठिकाणे सुरक्षित आहेत.

नव्याने येणारे पर्यटक धडपणे माहिती नसताना पाण्यात उतरण्याचे धाडस करतात. अपघात घडून काहींना प्राणाला मुकावे लागले आहे. खरे तर अशा ठिकाणी योग्य ते मार्गदर्शन करून पर्यटकांना आनंद घेऊ द्या, ही मागणी अनेकदा झाली आहे. मात्र स्थानिक प्रशासन धाडकन बंदीची कारवाई करून मोकळं होतं. परंतु पर्यटक येण्याचं काही थांबत नाहीत. पावसाळी पर्यटनामुळे स्थानिकांना रोजगारही मिळतो. जी ठिकाणं खरोखरच धोकादायक आहेत तिथे बंदी असलीच पाहिजे. दरम्यान, वर्षा सहलीचा आनंद घेताना पर्यटकांनी सुरक्षिततेचे भान राखावे, धबधब्यांमध्ये अति साहस करू नये, नदी-ओढ्यांच्या वेगवान प्रवाहात उतरू नये, घसरड्या कड्यांवर सेल्फी घेणे टाळावे तसेच परिसर स्वच्छ ठेवून प्लास्टिकमुक्त पर्यटनाला प्राधान्य द्या.

---

लोकसंसद

## लॉड्‌र्सवर भारतीय महिला संघाचा ऐतिहासिक विजय!

जागतिक क्रिकेटची पंढरी मानल्या जाणाऱ्या ऐतिहासिक लॉड्‌र्स मैदानावर इंग्लंडविरुद्ध पार पडलेल्या एकमेव कसोटी सामन्यात भारतीय महिला क्रिकेट संघाने इंग्लंडला २७० धावांनी हरवले आणि महिला क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी आपले नाव कोरले. या विजयाचे वेगळेपण म्हणजे इसवी सन १८८४ नंतर लॉड्‌र्स मैदानाच्या १४२ वर्षांच्या इतिहासात खेळवला गेलेला हा पहिलावहिला महिला कसोटी सामना होता. त्यामुळे या सामन्याला ऐतिहासिक महत्त्व होते. दुसरी गोष्ट म्हणजे १९३२ मध्ये भारताला कसोटी सामन्यांचा दर्जा मिळाल्यानंतर या मैदानावर पुरुष संघाला पहिल्या विजयासाठी तब्बल ५४ वर्षे वाट पाहावी लागली आणि १९८६ मध्ये प्रथमच पुरुष संघाने लॉड्‌र्स मैदानावर विजयाची नोंद केली. महिला संघाच्या विजयाचे संपूर्ण श्रेय संघाच्या अप्रतिम सांघिक कामगिरीला जाते. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर भारतीय महिला संघाने शेवटपर्यंत इंग्लंडवर पूर्ण वर्चस्व राखले. वेगवान गोलंदाज क्रांती गौडने सामन्यात ७ बळी घेत इंग्लंडच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले आणि ती सामनावीर ठरली. फलंदाजीत यष्टिरक्षक-फलंदाज यास्तिका भाटियाने शानदार शतक झळकावले आणि लॉड्‌र्सवर कसोटी शतक झळकावणारी ती जगातील पहिली महिला क्रिकेटपटू बनली. या कामगिरीमुळे या दोघींनी ऐतिहासिक लॉड्‌र्सच्या ‘ऑनर्स बोर्ड’वर स्थान मिळवून जागतिक क्रिकेटमध्ये नवा इतिहास रचला आहे. लॉड्‌र्सवरील भारतीय महिला संघाच्या ऐतिहासिक विजयाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन!

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे**

---

दिनविशेष

# कबड्डीचे ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व : महर्षी शंकरराव साळवी

भारतीय मातीचा अस्सल खेळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कबड्डीला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मानाचे स्थान मिळवून देण्याचे सर्वात मोठे श्रेय जर कोणाला द्यायचे असेल, तर ते महर्षी शंकरराव (बुवा) साळवी यांनाच. म्हणूनच महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने त्यांचा १५ जुलै हा जन्मदिन ‘कबड्डी दिन’ म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. हा दिवस केवळ एका व्यक्तीच्या जन्माचा नसून, भारतीय कबड्डीच्या पुनर्जन्माचा दिवस मानला जातो.

१५ जुलै १९३२ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील सावर्डे येथे त्यांचा जन्म झाला. वारकरी परंपरेतील संस्कार लाभल्यामुळे सर्वजण त्यांना प्रेमाने ‘बुवा’ म्हणत. साधेपणा, प्रामाणिकपणा आणि खेळावरील निस्सीम प्रेम हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख होती.

रायगड जिल्हा, विशेषतः पेण तालुक्यातील खारेपाट परिसर हा एकेकाळी कबड्डीची पंढरी म्हणून ओळखला जात होता. बांधण, वाशी, रोहा, पाली, कर्जत, उरण, नांदगाव अशा भागांत रात्रीभर कबड्डीचे सामने रंगत असत. हजारो प्रेक्षकांच्या उपस्थितीत खेळाडूंचा दमदार खेळ पाहण्यासाठी लोक पहाटेपर्यंत मैदानावर ठाण मांडून बसत. या सुवर्णकाळामागे महर्षी शंकरराव साळवी आणि रायगडचे ज्येष्ठ नेते प्रभाकर पाटील यांचे मोठे योगदान होते. साळवी यांनी केवळ स्पर्धा भरविण्यापुरते काम केले नाही, तर कबड्डीला संघटनात्मक बळ दिले. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, अखिल भारतीय कबड्डी महासंघ आणि जागतिक कबड्डी महासंघ अशा विविध संघटनांमध्ये त्यांनी महत्त्वाची पदे भूषवून खेळाच्या विकासासाठी आयुष्य समर्पित केले. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना शिवछत्रपती पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महर्षी साळवी यांच्या दूरदृष्टीमुळे १९५५ मध्ये महिला कबड्डीला राष्ट्रीय स्तरावर स्थान मिळाले. त्याचबरोबर कबड्डीला आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये स्थान मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. २००२ च्या बुसान आशियाई स्पर्धांपासून कबड्डी मॅटवर खेळली जाऊ लागली आणि त्यानंतर या खेळाने आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी झेप घेतली.

आज इराणसह अनेक देशांमध्ये कबड्डी लोकप्रिय झाली आहे. रायगड जिल्ह्यातील अनेक खेळाडूंना महर्षी साळवी यांच्या कार्यातून प्रेरणा मिळाली. पेणच्या काळभैरव संघाचे विजय विजू पेणकर म्हात्रे, बोर्वेचे आशिष म्हात्रे, बोरीचे संजय म्हात्रे, प्रमोद म्हात्रे, शहाबाजचे सुधीर पाटील यांसारख्या अनेक खेळाडूंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवले. रायगडची कन्या अभिलाषा शशिकांत म्हात्रे यांनी अर्जुन पुरस्कार आणि शिवछत्रपती पुरस्कार मिळवून जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले.

महर्षी साळवी यांच्या कार्याची दखल देशातील राष्ट्रपती, पंतप्रधान तसेच अनेक दिग्गज नेत्यांनी घेतली. साहित्यिक ग. दि. माडगूळकर यांनी त्यांना ‘अस्वस्थ माणूस’ ही उपाधी देत त्यांच्या ध्यासाचे कौतुक केले. कबड्डीचा प्रसार करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर केलेले अथक परिश्रम आजही प्रत्येक कबड्डीप्रेमीला प्रेरणा देतात.

आज रायगड जिल्ह्यात शेकडो पुरुष आणि महिला कबड्डी संघ कार्यरत आहेत. अलीकडेच पेण तालुक्यातील पिंपळपाडा येथील ज्येष्ठ पंच हिरामण भोईर यांना महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेचा उत्कृष्ट पंच पुरस्कार मिळाला. हा सन्मान रायगडच्या समृद्ध कबड्डी परंपरेचा गौरव आहे.

महर्षी शंकरराव साळवी यांनी एका ग्रामीण खेळाला जागतिक ओळख मिळवून दिली. त्यांनी दिलेली शिस्त, संघटनशक्ती आणि खेळाप्रती समर्पणाची शिकवण आजही तितकीच प्रेरणादायी आहे. १५ जुलै कबड्डी दिन हा त्यांच्या कार्याला अभिवादन करण्याचा आणि कबड्डीच्या उज्ज्वल परंपरेचा अभिमान बाळगण्याचा दिवस आहे. त्यांच्या कार्याचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**देविदास म्हात्रे गुरुजी, वढाव**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१५ जुलै

१) श्री.सुधाकर अनंत पतंगे चेंढरे-अलिबाग, १५-७-१९४७
२)श्री.रवींद्र नारायण गावकर पंतनगर, अलिबाग दि.१५-७-१९४१
३)श्री.विनायक शांताराम शिंपी चेंढरे,अलिबाग दि.१५-७-१९४८
४)श्री.विनोद नारायण भाटकर मु.आक्षी,अलिबाग दि.१५-७-१९४६
५)श्री.दिनकर महादेव पाटील चेंढरे, अलिबाग दि.१५-७-१९३७
६)श्री.महादेव गोविंद साखळकर मु.सासवणे, अलिबाग दि.१५-७-१९३९
७)श्री.विलास विनायक पाटील मु.वेश्वी, अलिबाग दि.१५-७-१९५५
८)श्री.केशव अर्जुन शेळके मु.वेश्वी, अलिबाग दि.१५-७-१९३८
९)श्री.सुरेश शिवराम म्हात्रे मु.मांडवा,अलिबाग दि.१५-७-१९४२
१०)श्रीम.कुंदा रघुनाथ घाग अलिबाग, दि.१५-७-१९५१
११)श्री.(डॉ)सुभाष शिवराम म्हात्रे मु.थळ, अलिबाग दि.१५-७-१९५७
१२)श्रीम.सीमादेवी संभाजी कसबे वरसोली, अलिबाग दि.१५-७-१९६२

# अतिवृष्टीने भातशेती संकटात

## बळीराजाला ओल्या दुष्काळाची भीती

**। पाली । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे संपूर्ण जिल्हा जलमय झाला आहे. याचा सर्वाधिक फटका किनारपट्टीच्या आणि ग्रामीण भागातील शेती क्षेत्राला बसला आहे. डोंगररांगांमधून वाहून आलेले पाणी आणि नद्यांच्या पुराचे पाणी शेतांमध्ये शिरल्याने संपूर्ण जिल्ह्यातील भातशेती पाण्याखाली गेली आहे. भाताची तरारलेले रोपे कुजली आहेत. यामुळे वर्षभर संपूर्ण कुटुंबाची गुजराण करणाऱ्या बळीराजाचे डोळे ओले झाले आहेत.



जिल्ह्याची मुख्य ओळख ही भाताचे कोठार म्हणून आहे. येथील बहुतांश ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णपणे भातशेतीवर अवलंबून आहे. पाऊस उशिरा आला मात्र, उशिरा आलेल्या पावसानंतर शेतकऱ्यांनी पेरणी केली.

भाताची रोपे हिरवीगार होऊन तरारली होती. मात्र, जुलै महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या अतिवृष्टीने या सर्व कष्टांवर पाणी फेरले आहे. सध्या शेतांना तळ्याचे स्वरूप आले असून तरारलेली भाताची कोवळी रोपे पूर्णपणे पाण्यात बुडाली आहेत. अनेक ठिकाणी पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने रोपे वाहून गेली आहेत, तर काही ठिकाणी सतत पाणी साचून राहिल्यामुळे ही रोपे कुजण्यास सुरुवात झाली आहे.

या अस्मानी संकटामुळे शेतकरी कमालीचा हवालदिल झाला आहे. डोळ्यांदेखत भाताची रोपे पाण्यात सडून चालली आहेत. पाणी ओसरले नाही, तर संपूर्ण वर्षभराचे पीक हातातून जाईल. शासनाने तातडीने या परिस्थितीची दखल घेऊन नुकसानीचे पंचनामे करावेत आणि आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहे.

अनेक ठिकाणी शेतांचे बांध फुटल्याने माती वाहून गेली आहे, ज्यामुळे जमीन नापीक होण्याचा धोका निर्माण झाला आहे. आधीच महागडी बियाणे, खते आणि मजुरीचा खर्च करून शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे कंबरडे या पुरामुळे पुरते मोडले आहे. प्रशासनाने कृषी विभागामार्फत तात्काळ ओल्या दुष्काळाची पाहणी करून बाधित शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी तीव्र भावना संपूर्ण जिल्ह्यातून व्यक्त होत आहे.

> **कृषी खात्याकडून ज्या शेतकऱ्यांची रोपे फुकट गेली आहेत, त्यांना पुनरपेरणीसाठी ७५ टक्के अनुदानावर नवीन बियाणे मिळणार आहे. परंतु, आता बियाणे पेरल्यानंतर लावणी आणि कापणीसाठी निसर्गाचा योग्य कालावधी मिळेल का, याचा विचार शेतकऱ्यांनी करावा हा कालावधी लक्षात घेऊन बाधित शेतकऱ्यांनी तातडीने कृषी खात्याकडे आपली नावे नोंदवावीत.जेणेकरून बियाण्यांचे वेळेत वाटप करता येईल. शासन या कठीण काळात बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.**
>
> **–राजेंद्र राऊत**



# राजे स्कूलमध्ये ग्रीन डे साजरा

**। सुतारवाडी । प्रतिनिधी ।**

डॉ. जी.आर. राजे प्री प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूल सुतारवाडी येथे ग्रीन डे साजरा करण्यात आला. यावेळी चिमुकल्यांनी विविध प्रकारच्या शोभिवंत रोपांची लागवड आपल्या शाळेच्या परिसरात केली. शिक्षिका कविता भालेराव, आणि शितल सानप यांनी प्रथम चिमुकल्यांना रोपांच्या लागवडीची आणि उपयोगांची माहिती सांगितली. शोभिवंत रोप आपल्या घरासमोर किंवा गॅलरीमध्ये असतील तर परिसराची शोभा कशी वाढते आणि वातावरण कसे प्रसन्न राहते, याबाबत मुलांमध्ये जागृती निर्माण केली. चिमुकल्यांनी आनंदाने आपल्या शाळेच्या परिसरात शोभिवंत रोपांची लागवड केली. रोप लावण्यासाठी खड्डा कसा काढायचा त्यामध्ये रोप कसे लावायचे याचा आनंद घेतला. शाळेतील मावशी सानिका मोरे यांनी यावेळी सहकार्य केले.

# चंद्रकांत सुतार पुरस्काराने सन्मानित

**। माथेरान–नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान येथील पत्रकार चंद्रकांत सुतार यांना आर्यारवी एंटरटेनमेंट आयोजित प्रतिष्ठेचा निर्भीड पत्रकार पुरस्कार–२०२६ देऊन गौरविण्यात आले.

मुंबईतील दादर (पूर्व) येथील मुंबई मराठी ग्रंथालय येथील सुरेंद्र गावसकरमध्ये आर्यारवी एंटरटेनमेंटकडून पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आर्यारवी एंटरटेनमेंटचे प्रमुख श्रीधर कीर जगप्रसिद्ध बोलका बाहुला कलाकार आणि जादुगार यांच्या हस्ते समाजकारण, जनसेवा आणि सामाजिक बांधिलकी जपत सातत्याने कार्य करणारे पत्रकार



चंद्रकांत सुतार यांना मानचिन्ह, सन्मानपत्र आणि शाल देऊन गौरविण्यात आले. सुतार हे कोकणवासीय समाज संस्था, माथेरानचे अध्यक्ष असून संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबवत आहेत. तसेच जनहिताच्या विविध प्रश्नांवर निर्भीडपणे पत्रकारिता करत त्यांनी समाजातील अनेक विषयांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने आवाज उठविला आहे.

# महागावमध्ये माश्यांचा भयानक सुळसुळाट

**। पाली । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील महागाव ग्रामपंचायत हद्दीत गेल्या काही दिवसांपासून माश्यांचा प्रचंड उपद्रव वाढला आहे. यामुळे स्थानिक ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी तातडीने फवारणी करण्याची मागणी केली आहे. सध्या महागाव परिसरातील घरे, व्यावसायिक दुकाने, हॉटेल्स आणि सार्वजनिक ठिकाणी माश्यांचे मोठे साम्राज्य पाहायला मिळत आहे. यामुळे अन्नपदार्थ दूषित होण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. घरात कुठेही बसणे अथवा जेवणेही माश्यांमुळे कठीण झाले असून, व्यावसायिक देखील यामुळे कमालीचे त्रस्त झाले आहेत.

पावसाळ्याचे दिवस असल्याने आधीच ठिकठिकाणी अस्वच्छता आणि दमट वातावरण आहे. त्यातच माश्यांच्या या वाढत्या सुळसुळाटामुळे परिसरात कॉलरा, डायरिया आणि इतर पोटाचे विकार यांसारख्या साथीच्या आजारांची लागण होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या परिस्थितीचा सर्वाधिक फटका लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आधीच आजारी असलेल्या रुग्णांना बसत असून

- **ग्रामस्थांना रोगराईची भीती**
- **तातडीने फवारणी करण्याची मागणी**

त्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ग्रामस्थांच्या माहितीनुसार, माश्यांचा उपद्रव वाढला असतानाही ग्रामपंचायत प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस पावले उचलली गेलेली नाहीत. प्रशासनाने तात्काळ पावले उचलून महागाववासीयांना या त्रासातून मुक्त करावे, अशी आग्रही मागणी आता जोर धरू लागली आहे.

# रक्तदानाचा महायज्ञ शिबीर यशस्वी

। पनवेल । प्रतिनिधी ।

समाजातील थॅलेसेमिया ग्रस्त रुग्णांना जीवनदान देण्याच्या उदात्त हेतूने आयोजित करण्यात आलेल्या ३१ व्या रक्तदान शिबिराला तब्बल १४९ रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदानाचा महायज्ञ यशस्वी केला. प्रल्हादराव झुलेलाल ट्रस्ट, आम्ही रक्तदाते पनवेलचे, पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट, विद्यार्थी वाहक संस्था पनवेल, पनवेल–नवी मुंबई पत्रकार संघ, पनवेल तालुका पत्रकार विकास मंच, विश्व सिंधी सेवा संगम आणि एमजीएम रक्तपेढीच्या संयुक्त विद्यमाने रविवारी, (दि.१२) जुलै रोजी पूज्य सिंधी पंचायत झुलेलाल मंदिर, पनवेल येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरास किशन तलरेजा, दौलत सचदेव, दिलीप जैस्वानी, चंदर देवानी, महेश तनवाणी, भागचंद खुबचंदानी, सनी गिडवानी यांनी भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले. अ‍ॅड. मनोहरजी सचदेव, अ‍ॅड. अमोलजी साखरे, साक्षी सचदेव, पांडुरंग हुमणे, किसन रौंदळ, मुरलीधर ढाके, संगीता साखरे, उज्वला व सचिन भिसे, प्रभाकर म्हात्रे, बन्सीलाल तळेकर, राजेश भगत शिबिराच्या व्यवस्थापनासाठी परिश्रम घेतले.


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८**
**(बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५**
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**स्व. श्रीमती कलावती भवानजी देढिया स्मरणार्थ महावीर ट्रेडर्स बाजार पेठ अलिबाग**



**कै. दामोदर धर्मा पाटील स्मरणार्थ अलिबाग**


# जानकीबाई टवळे यांचे निधन

**खांब :** रोहा तालुक्यातील खांब गावच्या रहिवासी जानकीबाई किसन टवळे यांचे बुधवारी (दि.८) वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या माजी उपसरपंच संतोष टवळे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी यांच्यासह त्यांचे आप्तस्वकीय व मित्र परिवार यांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुन, जावई, नातवंडे व पतवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी शुक्रवार दि.१७ जुलै रोजी, तर अंतिम धार्मिकविधी सोमवार दि.२० जुलै रोजी होणार आहे.



# ४० गावांचा पाणीपुरवठा सुरू

**नागोठणे :** अंबा नदीला आलेल्या प्रलयंकारी पुरामुळे येथील के टी बंधाऱ्यावर असलेल्या जेएसडब्ल्यू कंपनीच्या पंप हाऊसमधील वीजवाहिनी व जलवाहिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. वाहून गेलेल्या रस्त्याला भराव करून जलवाहिनी पूर्ववत करण्यासाठी जेएसडब्ल्यू कंपनी प्रशासनाकडून युद्धपातळीवर काम करून ही जलवाहिनी शनिवारी (दि.११) जुलै रोजी सुरू केली. त्यामुळे नागोठण्यापासून पेण तालुक्यातील डोलवी पर्यंतच्या सुमारे ४० गावांचा पाणीपुरवठा सुरळीत झाला आहे. अंबा नदीला आलेल्या प्रलयंकारी पुरामुळे अंबा नदीवरील के टी बंधाऱ्याचे दरवाजे बंद असल्याने बंधारा तुडुंब भरल्याने बंधाऱ्याच्या वरील भागातील पाटणसई, वाकण नाका, बाळसई, वजरोली आदी गावांतील परिसर पूर्णतः पाण्याखाली गेला होता. बंधाऱ्यावर पाण्याचा प्रचंड दबाव आलेला असतानाच बंधाऱ्याकडे जाणाऱ्या रस्त्याला सुमारे शंभर मीटर एवढ्या अंतरात खांड पडून या रस्त्याचा भराव वाहून गेला होता. बंधाऱ्यात अडकलेले पाणी याच मार्गाने प्रचंड वेगाने वाहून गेल्यानेच नागोठणे शहरात सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. जलवाहिनी सुरू केल्यामुळे पाणीपुरवठा सुरळीत झाला आहे. त्यामुळे जेएसडब्ल्यू कंपनीचे राजेशकुमार रॉय, बळवंत जोग यांनी स्वतः फील्डवर उतरून आपल्या सुमारे १५० लोकांच्या टीमच्या सहकार्याने हे काम केले आहे.

# नंदिनी बामगुडेला वकील पदवी



**माणगाव :** माणगाव नगरपंचायत हद्दीतील आदर्श समतानगर येथील रहिवाशी माणगाव नगरपंचायतीच्या महिला व बालकल्याण समिती सभापती नंदिनी बामगुडे यांनी एलएलबी हि मानाची पदवी संपादन केली असून त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांचे माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. राजीव साबळे, नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे यांच्यासह आदर्श समतानगर रहिवाशी मंडळ, महिला मंडळ, युवा क्लब व प्रभाग क्र. ८ मधील सर्व ग्रामस्थ बंधू-भगिनी यांनी विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. बामगुडे यांचे वकील होण्याचे स्वप्न होते. हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी नंदिनी यांनी अथक परिश्रम, जिद्द, ध्येय, चिकाटी ठेवून माणगाव येथील अशोकदादा साबळे विधी महाविद्यालयातून एलएलबीचे शिक्षण घेऊन त्यांनी वकील होण्याचा मान मिळविला आहे. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी लढून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करेन असे त्यांनी सांगितले.


मे. विशेष वसुली व विक्री अधिकारी,
द्वारा रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा
महासंघ (मर्या.) अलिबाग, रायगड ४०२२०१.
पत्ता :- 'कृष्णमंदिर सोसायटी' १०१,
N.K.G.S.B. बँकेच्यावर मारुती नाका,
अलिबाग, ता. अलिबाग, रायगड -४०२२०१.
फोन नं. ८१०८४०४०७६/८६९८५६४०७६.

जा.क्र.००२/झेड नोटीस/महासंघ/एस.आर.ओ./१५६/२०२६ दिनांक : १३/०७/२०२६

**'नमुना झेड'**
**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबती नोटीस**
**(नियम १०७ पोटनियम (११) (ड-१) (सहा) (अ)**

ज्याअर्थी जनसेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अलिबाग, जि. रायगड या संस्थेचे कर्जदार श्री किरण प्रल्हाद खांडेकर, पत्ता. रा.बुरुमखाण, गणपती मंदिरासमोरची गल्ली, पो.वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड.. यांचे विरुद्ध सक्तीच्या मार्गाने कर्ज वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये हुकुमनामा मिळविला आहे. ऋणको अथवा थकबाकीदार कर्जदार श्री. किरण प्रल्हाद खांडेकर यांच्या नावावरील जप्त केलेली निम्पलिखीत स्थावर मालमत्ता विक्री करुन कर्ज वसुल करावयाचा आहे.

ज्याअर्थी खाली सही केलेले विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी ऋणको सभासद श्री. किरण प्रल्हाद खांडेकर यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे कलम १५६ अन्वये दिनांक २४/०४/२०२४ रोजी मागणी नोटीस व दिनांक ०६/१२/२०२४, रोजी जप्ती पूर्वीची नोटीस व दिनांक ०६/०१/२०२५ रोजी अंतिम जंगम नोटीस दिली असुन पुढे निर्दिष्ट केलेली स्थावर मालमत्ता यापूर्वी जा. क्र.०२० /स्थावर जप्ती/एस.आर.ओ./१५६/२०२४, दिनांक :- १९/१२/२०२४ रोजी स्थावर जप्ती आदेशान्वये जप्त केलेली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९९ मधिल तरतुदीनुसार वसुली दाखला दिल्यानंतर स्थावर मालमत्तेचे खाजगी स्वाधिन करण्यात आलेली देण्यात किंवा बोजा निर्माण करण्यात आला असेल तर त्या सर्व बाबी संस्थेच्या बाबतीत रद्द अथवा निरर्थक ठरतील. ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्याने नोटीस देण्यात येते कि, खाली निर्दिष्ठ केलेल्या स्थावर मालमत्तेचा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ मधिल कलम १५६ व नियम १०७ (११) (ड.१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार वार मंगळवार दिनांक २३/०६/२०२६ या दिवशी ताबा घेतला आहे. त्या शिवाय स्थावर मालमत्ता जाहीर लिलावाने विक्री करता येणार नाही.

विशेष करुन ऋणकोला आणि सर्व नागरीकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, खाली निर्दिष्ठ केलेल्या स्थावर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करु नये, आणि व्यवहार केल्यास कर्जदार श्री.किरण प्रल्हाद खांडेकर यांच्या वसुली दाखल्यातील बोजाची रक्कम रु. ८,७४,३६५/-(अक्षरी रु आठ लाख चौऱ्याहत्तर हजार तिनशे पासष्ट मात्र) आणि दिनांक १४/०३/२०२४ पासुन कर्ज वसुल होईपर्यंत व्याज, दंड व्याज, आदेशिकेचा खर्च व इतर खर्चासह असा एकुण रकमेस अधिन रहावे लागेल संबंधित ताबा घेतलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन खालील प्रमाणे.

**ताबा घेतलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| अ. क्र. | कर्जदार व जामीनदांनी नावे | पत्ता | वसुली दाखला क्रमांक व दिनांक | वसुली दाखला येणे रक्कम | ताबा घेतलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन | मिळकतीची चतुः सिमा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री किरण प्रल्हाद खांडेकर,<br>श्री बिभीषण किसन जेधे,<br>श्री. शेखर विलास भिंगारे, | पत्ता.रा.बुरुमखाण, गणपती मंदिरासमोरची गल्ली, पो. वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड.<br>रा. सदाशिव को ऑप. हौ.सोसा., नागडोंगरी, तुषार हॉटेलच्या मागे, चेंढरे,ता. अलिबाग, जि. रायगड.<br>रा. पो. नवेदर नवगाव, ता.अलिबाग, जि. रायगड. | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग/२०८/२०२३, दिनांक १०/०५/२०२३ | रु. ८,७४,३६५/- यावर दिनांक १४/०३/२०२४ पासून १५ टक्के प्रमाणे होणारे व्याज व इतर खर्च | ग्रामपंचायत,वरसोली ता.अलिबाग, जि. रायगड हद्दीतील मौजे वरसोली येथिल मालमत्ता क्र.१७७७, क्षेत्रफळ, ५७६ चौ. फुट | -- |

सदरचा ताबा नोटीस आज दिनांक १३/०७/२०२६ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.
ठिकाण: अलिबाग.
दिनांक १३/०७/२०२६.

**सही/-**
**एस. आर. गोठणकर.**
**विशेष वसूली व विक्री अधिकारी**
**रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघ (मर्या.)**
**अलिबाग- रायगड.**

प्रत माहिती साठी :-
१) श्री. किरण प्रल्हाद खांडेकर, पत्ता:- रा. बुरुमखाण, गणपती मंदिरासमोरची गल्ली, पो. वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड..
२) श्री. बिभीषण किसन जेधे, रा. सदाशिव को. ऑप. हौ. सोसा., नागडोंगरी, तुषार हॉटेलच्या मागे, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड.
३) श्री. शेखर विलास भिंगारे, पत्ता. रा. पो. नवेदर नवगाव, ता. अलिबाग, जि. रायगड.
प्रत सविनय सादर :-
४) मा. तहसिलदार व तालुका न्यायदंडाधिकारी, ता.अलिबाग, जि.रायगड..
५) मा. जिल्हा उप निबंधक सो सहकारी संस्था रायगड अलिबाग.
६) मा.गट विकास अधिकारी सो., पंचायत समिती अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.
७) मा. जिल्हाधिकारी सो., ता.अलिबाग, जि. रायगड.
प्रत पुढील कार्यवाहीसाठी रवाना :-
८) मा.ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड यांना विनंती करण्यात येते की, सदर आदेशाची नोंद घेवून आपले कार्यालयाचे नोटीस बोर्ड वर प्रसिद्ध करावा.
९) मा. चेअरमन/सचिव/मुख्यकार्यकारी अधिकारी, जनसेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अलिबाग, जि.रायगड यांना विनंती करण्यात येते की, सदर आदेश संस्थेच्या शाखा कार्यालयाचे नोटीस बोर्ड वर प्रसिद्ध करावा..
ठिकाण : अलिबाग.
दिनांक : १३/०७/२०२६.

सही/-
**एस.आर.गोठणकर.**
**विशेष वसूली व विक्री अधिकारी रायगड**
**जिल्हा सहकारी पतसंस्थांचा**
**महासंघ (मर्याग) अलिबाग-रायगड**



**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०६/२३७/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १४/०७/२०२६प्रति,

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**

श्री./श्रीमती.
मा.सदस्य/सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.
महोदय/ महोदया,

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा क्र.६, बुधवार दिनांक २२/०७/२०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता, महापालिकेच्या ''आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**सर्वसाधारण सभा क्रमांक ०६, दिनांक २२/०७/२०२६ ची**
**विषयपत्रिका**

१. मागील सर्वसाधारण सभा क्र. ५ दिनांक २३/०६/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.
२. प्रश्नोत्तरे
३. मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :
१. दिनांक २०/०५/२०२६ रोजीचा स्थगित विषय - पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - ड, प्रभाग क्र.१९ मधील अं.भु.क्र.५०६ कोळीवाडा मार्केड यार्ड परिसरातील स्मशानभूमी विकसीत करणे. या कामाच्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
२. दिनांक २०/०५/२०२६ रोजीचा स्थगित विषय - देहरंग धराणातून पनवेल शहराकरीता वाढीव पाणी पुरवठा योजना करणेकामी प्रस्ताव जागतिक बँक सहाय्यित महाराष्ट्र नागरी पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुर्नवापर योजनेअंतर्गत (MEWREP) प्रशासकीय मान्यतेकरीता शासना सादर करणेबाबत.
३. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विद्यमान एलईडी पथदिवे देखभाल, दुरुस्ती तसेच नवीन एलईडी लाईट्स आणि CCMS चा पुरवठा, स्थापना आणि देखभाल दुरुस्ती (१० वर्षे) साठी राज्यस्तरावर नेमलेल्या निविदाधारक राज्यस्तरावर M/s BAC Infratech Pvt.Ltd and M/s Vinic Global PVt. Ltd (JV) या संस्थेबरोबर करारनामा करणेकरिता मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.
४. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कळंबोली व नवीन पनवेल येथील विविध ठिकाणच्या उद्यानांमध्ये डेकोरेटिव्ह पथदिप खांब उभारुन कार्यान्वित करणे.
५. पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर येथील सेक्टर १२, भुखंड क्र. ५८B येथे उद्यान विकसित करणे.
६. पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली येथील सेक्टर २०, भुखंड क्र. १९ येथे उद्यान विकसित करणे.
७. पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली येथील सेक्टर ०६ E , भुखंड क्र. ०९ B येथे उद्यान विकसित करणे.
८. पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर येथील सेक्टर- १२, अं. भु. क्र. १२ अ येथील मच्छी मार्केट (दैनिक बाजार) इमारतीचा परिसर विकसीत करणे, संरक्षण भिंत बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे.
९. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१८ पनवेल येथे स्वप्नरेखा सोसायटी ते ठाणा नाका जंक्शन येथे जुने पावसाळी गटार तोडुन नविन गटार बांधणे.
१०. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र -१४ मधील एच ओ सी कॉलनी लगत असलेल्या कातकरवाडी ते जिंदाल उपटाउन एव्हेन्यु इमारती पर्यंत आर.सी.सी पावसाळी गटाराचे बांधकाम करणे.
११. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-अ व इतर मध्ये रस्त्यालगत असणाऱ्या गटर,पादचारी मार्गामधील इन्स्पेक्शन चेंबर्सवर वेळोवेळी आवश्यकते नुसार सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन वर्षाकरीता झाकणे लावणे व किरकोळ दुरुस्ती करणे.
१२. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभूमी मध्ये पाण्याची व्यवस्था करणे.
१३. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात नवीन पाण्याचे पंप पुरवणे आणि बसविणे. (२ वर्षाकरिता)
१४. शिलार धरण प्रकल्पातंर्गत धरणाच्या भागभांडवली खर्चातील हिस्साची रक्कम जलसंपदा विभागास कामाच्या प्रगतीनुसार उपलब्ध करुन करणेबाबत.
१५. मेट्रो मार्ग-१२ (कल्याण-तळोजा (अमनदुत)) मार्गाचे अंमलबजावणीकरिता मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणास पनवेल महानगरपालिकेकडून आर्थिक सहाय्य मिळणेकामी विनंती.
१६. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कामोठे येथील ८५ द.ल.लि. क्षमतेच्या मलशुध्दीकरण केंद्रातील कार्यान्वित असलेल्या ब्लोअरऐवजी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित ॲक्टिव्ह मॅग्नेटिव्ह बेअरिंग व इंटिग्रेटेड आयआयओटी सिस्टम सह असलेले ब्लोअर्स पीपीपी /रेस्को डीम्ड सेव्हिंग शेअरिंग तत्वावर बदलणे या कामाचा अहवाल, अंदाजपत्रक व निविदा सादर करणेकामी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) इत्यादी बाबी निश्चित करण्यासाठी MAHAPREIT या शासकीय संस्थेस मान्यता देणेबाबत.
१७. पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये अनावश्यक / धोकादायक वाढलेल्या वृक्षांच्या छाटणी केलेल्या फांद्या व पडलेले वृक्ष यांची विल्हेवाट लावणेकामी ट्रॅक्टर ट्रॉलीसह वूड चीपर मशीन प्रभाग निहायनुसार खरेदी करणे.
१८. पनवेल महानगरपालिकेचा सन २०२५-२६ या कालावधीकरिता मुंबई विद्यापीठामार्फत तयार करण्यात आलेला पर्यावरण सद्यस्थिती अहवाल (ESR) मा. सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत.
१९. पनवेल महानगरपालिका दिव्यांग कल्याण विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेच्या अर्थसहाय्यात वाढ करणेबाबत.
२०. श्री. नितिन देवराम साके यांचा माहिती व जनसंपर्क अधिकारी, गट ब पदाचा राजीनामा स्विकृत करणेबाबत.
२१. ''प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना'' या खाण बाधित क्षेत्रातील गरीब व गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी संधी मिळणेकरिता घरघंटी / शिवणयंत्र/ मिरची कांडप DBT तत्वावर पुरविणेबाबत.
२२. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात ज्येष्ठ नागरिकांसाठी ''विरंगुळा केंद्र'' स्थापन करुन धोरण ठरविणेबाबत.
२३. समाज विकास मार्फत पनवेल महानगरपालिका हद्दीतील युवक-युवतींना MSCIT (Maharashtra State Certificate in Information Technology) मोफत प्रशिक्षण देणेबाबत.
२४. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील फरशीपाडा, आडिवली, रोहिंजण व पेणधर येथील शाळांकरीता तात्पुरत्या स्वरुपात भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन घेणेबाबत.
२५. गणेशोत्सव व नवरात्रौत्सव २०२६ निमित्त पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध विसर्जन घाट येथे सुविधा पुरविणे, दुरुस्ती करणे व कृत्रिम तलाव बांधणेबाबत.
२६. पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील अं. भु. क्र. १८४/१ ए पार्ट बहुमजली यांत्रिकी वाहनतळ उभारणे प्रस्तावास व खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**(मा.महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये )**

सही/-
**नानासाहेब कामठे**
**महापालिका सचिव**
**पनवेल महानगरपालिका**

महापालिका भवन, पनवेल
दिनांक :- १४/०७/२०२६.

# ‘देवकुंड’ बंद आदेशाला हरताळ

## ● दोन्ही पर्यटकांचे मृतदेह सापडले ● पर्यटन नियंत्रण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

भिरा येथील देवकुंड धबधब्यावर दोन तरुणांचा मृत्यू झालेल्या दुर्घटनेने रायगड जिल्ह्यासह संपूर्ण राज्याला हादरवून सोडले आहे. मात्र ही केवळ नैसर्गिक आपत्ती नव्हती की प्रशासनाच्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करून घडलेली घटना एवढ्यावर हा विषय मर्यादित राहत नाही. या दुर्घटनेने प्रशासनाच्या अंंलबजावणीची परिणामकारकता, प्रतिबंधित क्षेत्रातील सुरक्षा व्यवस्था, स्थानिक पातळीवरील बेकायदेशीर मार्गदर्शन आणि पर्यटन नियंत्रण व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहेत.

माणगाव उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत देवकुंड, ताम्हिणी घाट, सिक्रेट पॉईंट आणि इतर धोकादायक पर्यटनस्थळांवर स्पष्ट बंदी लागू केली होती. परिसरात पोलीस व वन विभागाचा बंदोबस्तही तैनात होता. अशा परिस्थितीत पुण्यातून आलेल्या २१ पर्यटकांचा गट प्रतिबंधित क्षेत्रात पोहोचलाच कसा, हा आता चौकशीचा केंद्रबिंदू ठरत आहे. प्राथमिक माहिती नुसार, संबंधित पर्यटकांना सुरुवातीला पोलिसांनी परत जाण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर त्यांनी कथितपणे म्हसेवाडी परिसरातील चोरवाटेने देवकुंड गाठल्याची चर्चा सुरू आहे. गोपाळ रामलाल राठोड आणि विष्णू विलास ढोख हे दोघे पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्यानंतर स्थानिक स्वयंसेवक, शेलारमामा रेस्क्यू टीम, एसव्हीआरएसएस पथक, पोलीस आणि स्वयंसेवक यांनी तात्काळ घटनेनंतर शोधरोहीम राबविली होती मात्र रविवारी सायंकाळी काळोख पसरल्यानंतर ही शोध मोहीम थांबवली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सोमवारी (दि.१३) सकाळी पुन्हा ही शोध मोहीम तीव्र करण्यात आली. अखेर दुपारी या दोन्ही बेपत्ता बुडालेल्या पर्यटकांचे सुमारे २४ तासांनंतर दोन्ही मृतदेह बाहेर काढण्यात रेस्क्यूला यश आले. मात्र या दुर्दैवी घटनेने पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित केला आहे की, बचावकार्य प्रभावीपणे झाले; पण दुर्घटना घडूच नये यासाठीची यंत्रणा किती प्रभावी?

देवकुंड परिसरात यापूर्वीही अनेक जीवितहानीच्या घटना घडल्या आहेत. प्रत्येक घटनेनंतर कठोर कारवाईची घोषणा झाली, बंदी आदेश लागू झाले, सुरक्षा वाढविण्याची आश्वासने देण्यात आली. तरीही दरवर्षी त्याच स्वरूपाच्या दुर्घटना घडत असल्याने केवळ आदेश जारी करणे आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यामधील दरी स्पष्ट होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. या प्रकरणात केवळ पर्यटकांचा निष्काळजीपणा किंवा केवळ पोलिसांची निष्क्रियता यापैकी एकाच घटकाला दोष देऊन प्रश्न सुटणार नाही. पर्यटकांनी नियम मोडले असतील तर पर्यटकांना त्या ठिकाणी जाणाऱ्या चोरवाटा अद्याप खुल्या कशा? बंदी आदेशांची अंमलबजावणी किती प्रभावी होती? पर्यटनस्थळांच्या सुरक्षेसाठी दीर्घकालीन नियोजन का झाले नाही? या सर्व प्रश्नांची निष्पक्ष चौकशी होणे तितकेच आवश्यक आहे. देवकुंड हा पर्यटनाचा नव्हे, तर सुरक्षित पर्यटन व्यवस्थापनाचा प्रश्न बनला आहे. प्रशासन, पोलीस, वन विभाग, स्थानिक यंत्रणा, एकत्रित आढावा घेऊन जबाबदारी निश्चित केल्याशिवाय अशा दुर्घटना थांबणार नाहीत.

# निवडक

## तोंडसुरे नळ पाणीपुरवठा योजनेतील गावांचा पाण्यासाठी संघर्ष

**म्हसळा :** उशिरा का होईना पण जुलै महिन्यात धुवाधार पाऊस सुरू पडत असतानाही तोंडसुरे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना वारंवार बंद पडत असल्याने योजनेअंतर्गत येणाऱ्या ८ गावांसह चार वाड्यांतील नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.पाऊस पडूनही तोंडसुरे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेतील ग्रामस्थ नळाला पाणी कधी येणार याचीच वाट पाहत आहेत.या योजनेचे मागील पंधरा दिवसांपासून पाणीपुरवठा पूर्णपणे खंडित असून गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून नियमित व सलग पाणी मिळत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. उन्हाळ्यात बहुतांश गावांत टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला. यासंदर्भात शिखर समितीचे अध्यक्ष महादेव चांगु पाटील यांनी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन सादर केले आहे. संबंधित पाणी पुरवठा खात्याचे उपअभियंता व अभियंत्यांना अद्याप पाईपलाईनमधील बिघाड शोधण्यात यश आले नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून समस्येची गांभीर्याने दखल घेतली जात नसल्याची खंतही व्यक्त करण्यात आली आहे.योजनेची तातडीने दुरुस्ती करून नियमित पाणीपुरवठा सुरू करावा अन्यथा योजना तात्पुरती बंद करून सर्व प्रभावित गावांना पुन्हा टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा अशी मागणी करण्यात आली आहे. मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास कायदेशीर मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.



## सेतूसाठी तत्परतेने शेडची उभारणी

**रसायनी :** विजय ठोसर यांनी प्रशासनाला निवेदन देताच नवीन प्रशासकीय कार्यालयाला लागूनच शेडची उभारणी करण्यात आली आहे. खालापूर तालुक्याला नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यात आली असून, तिचा लोकार्पण सोहळा जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत पार पडला. ही इमारत महसूल विभागाची असली, तरी तिचा आराखडा हा सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केला असून, बांधकाम करण्याची जबाबदारीदेखील त्यांचीच होती, या इमारतीत तळ मजल्यावर सेतू कार्यालय सुरू करण्यात आले असून, येथे अनेक दाखले उपलब्ध होतात, त्यामुळे येथे येणारे नागरिक, विद्यार्थी, दिव्यांग व अन्य लोकांना उन्हात आणि आता पावसात उभे रहावे लागत होते, याची जाणीव तहसिलदार अभय चव्हाण यांना होती, परंतु शेड उभारण्यास लागणारा निधी उपलब्ध नसल्याने स्वतः तहसीलदार अभय चव्हाण, नायब तहसीलदार यांनी ही शेड जनतेसाठी लोकसमूहातून बांधण्याचा निर्णय घेतला आणि त्याला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे प्रशासकीय इमारतीला लागूनच शेड ची उभारणी करण्यात येत आहे.

## नवीन मराठी शॉर्ट फिल्म सादर

**रायगड :** महाराष्ट्रातील प्रसिद्ध दागिन्यांचा ब्रँड जगन्नाथ गंगाराम पेडणेकर (जेजीपी) ज्वेलर्सने द गोधडी इफेक्ट ही मराठी शॉर्ट फिल्म सर्वांसाठी आणली असून या भारतीय संस्कृतीतील जिव्हाळ्याची नाती दर्शवणारी ही कथा आहे. जितेंद्र जोशी, मधुराणी गोखले, सई गोडबोले आणि प्रदीप वेलणकर या मराठी कलाकारांनी यात काम केलं असून जुन्या व प्रेमाची ऊब असलेल्या साड्यांपासून बनवलेल्या गोधडीवरून ही गोष्ट प्रेरित आहे. आठवणी नवं रूप घेतात, पण त्या पिढ्यानपिढ्या जिवंत राहतात, हेच ही कथा सांगते.याच कलाकारांना घेऊन जे.जी.पी. ज्वेलर्सने बनवलेली ही दुसरी कॅम्पेन आहे. या आधी द रिझल्ट या सणासुदीच्या फिल्ममध्ये आजच्या कुटुंबातील समानतेबद्दल बोललं गेलं होतं, आणि प्रेक्षकांची कौतुकाची दाद ही मिळाली होती. रोजच्या आयुष्यातील साध्या व अर्थपूर्ण गोष्टींमधून हा ब्रँड लोकांशी नातं जोडत आहे. जुने दागिने म्हणजे फक्त जपलेल्या आठवणींपर्यंत मर्यादित नसून नवीन आठवणी बनवण्याची एक संधीही आहे. या कॅम्पेनबद्दल बोलताना जगन्नाथ गंगाराम पेडणेकर (जेजीपी) ज्वेलर्सच्या मॅनेजिंग डायरेक्टर आसावरी पेडणेकर म्हणाल्या, प्रत्येक दागिन्याची स्वतःची एक गोष्ट असते त्यात सण, नाती आणि पिढ्यांपिढ्या टिकणाऱ्या आठवणी असतात. द गोधडी इफेक्टमधून आम्हाला या भावना साजऱ्या करायच्या आहेत आणि लोकांना गोल्ड एक्स्चेंजला नव्या नजरेने बघायला सुचवायचं आहे. अद्भूत ह्या आमच्या ब्रँड एजन्सीने हा विषय अत्यंत संवेदनशीलतेने हाताळला आहे


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy for Furniture store Manager, location- Zirad, Qualification Graduation, MBA Experience- 2-4 years in Retail Contact- 9823585321
- सकाळी ८-९ या वेळात आणि ८.१५ ते १० या वेळेत घरकामासाठी दोन वेगवेगळ्या बायका पाहिजे आहेत. संपर्क - ९२८४५५५३१४
- EDII द्वारा उद्या प्रकल्प अंतर्गत उद्या महिला उद्योजिका असोशिएनद्वारा अलिबाग येथे ‘उद्या बाजार’ स्टोअर्स करीता अनुभवी रिटेल स्टोअर्स मॅनेजर (महिला) तसेच सेल्स गर्ल पाहिजेत संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक संपर्क - ७७७५८०२४९७ ईमेल- pasb-c@ediindia.org
- गिरीष एंटरप्रायजेस, अलिबाग आवश्यक पदे : ऑफिस कामासाठी १ मुलगी (किमान १२ वी उत्तीर्ण) साईटवरील कामासाठी २ हेल्पर मुले (शिक्षणाची अट नाही) टू-व्हिलर चालवता येणे आवश्यक स्थानिक उमेदवारांना प्राधान्य ऑफिस वेळ : सकाळी ९:०० ते सायंकाळी ६:०० इच्छुक उमेदवारांनी ८२३७३१६२१८ ह्या नंबर वर आपला रिझ्युम व्हाट्सअप करावा.
- कामासाठी माणसे/मुलगे पाहिजे. १) कंपनीचे मोबाईल विक्रीसाठी दुकानदारांकडे उरण, उलवा/महाड-माणगाव, पेण-पोयनाड, २) डिलेवरी एस.टी.ने अथवा बाईकने (पेण-अलिबाग) (रेवदंडा-मुरूड-अलिबाग) लायसन्स पाहिजे. (बाईक आमची) ३) कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. ४) पार्ट/फुल टाईम चालेल. (संपर्क : ८८८८२२०२२१)

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## खासगी वाहनांवर शासकीय पाट्या

### पक्षीय पदाधिकारी, संघटनांचे अध्यक्ष, पदाधिकाऱ्यांचीही मनमानी?

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात खासगी वाहनांवर विविध प्रकारच्या पदनामांच्या आणि शासकीय स्वरूपाच्या पाट्या लावण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून, वाहतूक नियमांची उघडपणे पायमल्ली होत असल्याचे चित्र आहे.

काही वाहनांवर शासन, सरकारी काम, ऑन गव्हर्नमेंट ड्युटी, प्रेस अशा पाट्या, तर काही वाहनांवर राजकीय पक्षांचे अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, आमदार, विविध सामाजिक संघटनांचे अध्यक्ष, पदाधिकारी, सल्लागार, समन्वयक अशा पदनामांच्या मोठमोठ्या पाट्या लावून वाहने रस्त्यावर सर्रास फिरताना दिसत आहेत. यामुळे कायद्याचा धाक उरला आहे का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

कायद्यानुसार खासगी वाहनांवर अधिकृत परवानगीशिवाय शासकीय ओळख दर्शविणाऱ्या पाट्या, चिन्हे किंवा अधिकाराचा आभास निर्माण करणारे फलक लावण्यास परवानगी नाही. तसेच वाहनाच्या नोंदणी क्रमांकापेक्षा मोठ्या आकारात किंवा लक्ष वेधून घेणाऱ्या स्वरूपात विविध पदनामांचे फलक लावणेही नियमबाह्य ठरू शकते. तरीही उरणमध्ये अनेक खासगी वाहनांवर अशा पाट्यांचा खुलेआम वापर सुरू असल्याचे दिसून येत आहे.

काही वाहनांवर आमदार, प्रेस, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष, संस्थापक, सल्लागार अशा पदनामांचे मोठे फलक लावून वाहने फिरवली जात आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत असून, अशा पाट्यांचा गैरवापर वाढत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या मागणीला मान्यता

### नगरसेवक शशिकांत शेळके यांच्या पाठपुराव्याला यश

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ९ अंतर्गत येणाऱ्या वळवळी, टेंभोडे, वाघऱ्याची वाडी आणि सागवाडी येथे वाढत्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर मुख्य चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी नगरसेवक शशिकांत शेळके यांनी महापालिका आयुक्तांकडे केली होती.

या मागणीला नगरसेवक महादेव मधे, नगरसेविका दमयंती भोईर, के. के. कडव, मारुती चिखलेकर, सचिन चौधरी, चंद्रकांत पाटील, राजेश पेटकर, मोहन गडगे आणि मधुकर बोलके यांनीही पाठिंबा देत अधिकाऱ्यांसोबत पाहणी केली होती. या मागणीची दखल घेत महापालिका प्रशासनाने प्रस्तावास मान्यता दिली असून माहिती-तंत्रज्ञान विभागाला आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

या चारही गावांमध्ये रात्रीच्या वेळी चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मुख्य चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांनी संयुक्तपणे केली होती. त्यानुसार महापालिकेने प्रस्ताव मंजूर करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

याबाबत नगरसेवक शशिकांत शेळके म्हणाले, वळवळी, टेंभोडे, वाघऱ्याची वाडी आणि सागवाडी येथील नागरिकांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे आवश्यक होते. प्रशासनाने या मागणीला मान्यता दिल्याबद्दल समाधान आहे. काम तातडीने पूर्ण करून ही यंत्रणा कार्यान्वित व्हावी, यासाठी आमचा सातत्याने पाठपुरावा सुरू राहील.

## रोजगार मेळाव्याचे आयोजन

**रायगड :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँन्ड रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त बुधवारी (दि.१५) विसपुते कॉलेज पनवेल येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकासचे प्र.सहायक आयुक्त श्रीकांत कोकाटे यांनी केले आहे.

## शिंदे गटाला अजित पवार गटाचा धक्का

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत तालुक्यात शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांचा राजकीय चढाओढ कायम असल्याचे दिसून येत आहे.

त्यात आता तर थेट पक्षातील कार्यकर्ते फोडण्याचा धडाका सुरू झाला आहे.राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे युवक कार्यकर्ते सागर शेळके यांच्या पुढाकाराने शिवसेना शिंदे गटातील महिला आघाडीच्या पदाधिकारी यांना राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये आणत जोरदार धक्का शिंदे गटाला दिला आहे.

कर्जत येथील राष्ट्रवादी काँग्रेस भवन येथे झालेल्या कार्यक्रमात शिवसेना शिंदे गटाच्या महिला आघाडीच्या उप तालुका संघटिका सुरेखा पिंगळे यांनी आपल्या सहकारी कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश केला.

उमरोली ग्रामपंचायतीतील आषाणे गावातील शंकर पिंगळे, सुरेश श्रीखंडे, सूरज पिंगळे, आकाश पिंगळे, गुरुनाथ पिंगळे, पांडुरंग पिंगळे, यमुना पिंगळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे,जिल्हा कार्याध्यक्ष अशोक भोपातराव, जिल्हा सरचिटणीस एकनाथ धुळे, जिल्हा प्रवक्ते भरत भगत तसेच तालुका अध्यक्ष दीपक श्रीखंडे, महिला तालुका अध्यक्ष ॲड. रंजना धुळे आदीसह सागर शेळके आणि अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## माथेरान नगरपरिषद कामकाजाची चौकशी होणार-महसूलमंत्री



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या पर्यटन स्थळी असलेल्या नगरपरिषदकडून अनेक ठिकाणी शासकीय जमिनीवर बांधकामे झाली आहे. या सर्व बांधकामांची चौकशी कोकण आयुक्त यांच्या माध्यमातून केली जाईल आणि तो अहवाल हिवाळी अधिवेशनात ठेवण्यात येईल असे जाहीर उत्तर राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधिमंडळात दिले आहे. त्यामुळे माथेरान नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून माथेरान मधील अशा बांधकामाबद्दल भीती निर्माण झाली आहे.

माथेरान या पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असलेल्या माथेरान मध्ये चुकीच्या दिलेल्या बांधकाम परवांगीची चौकशी होणार आहे. पावसाळी अधिवेशनात उपस्थित झालेल्या प्रश्नोत्तराच्या दरम्यान महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर केले आहे.माथेरान मधील महसूल विभागाची जमीन असून ती भाडेपट्टीवर दिली आहे. अशा पर्यावरण दृष्टा संवेदनशिल असलेल्या जमिनीवर बांधकामे उभी राहिली आहेत.केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या सनियंत्रन समितीची परवानगी आवश्यक आहे. माथेरान येथिल मुख्याधिकारी यांनी सर्व नियम धाब्यावर बसवून ह्या परवानग्या दिल्याचे यांची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. कोकण विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समिती गठीत करून चौकशी आहेत.त्यानंतर शासन संबंधित अहवालावर कारवाई करणार आहे.त्यामुळे त्या अहवालाची प्रतिक्षा निर्माण झाली आहे.

चौकशी दरम्यान माथेरान मधिल प्रशासकीय राजवटीत काळात मोठ्या प्रमाणात भष्टाचार झाल्याचे नागरिक सोशल मिडियावर रोज याबाबत चर्चा करताना दिसत आहेत.

## न्हावाशेवा वाहतूक पोलिसांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

### ■ शाळा दत्तक योजनेतून वाहतूक शिस्तीचे संस्कार

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

नवीमुंबई वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त राहुल खाडे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या शाळा दत्तक योजना २०२६-२०२७ अंतर्गत न्हावाशेवा वाहतूक शाखेने काल १३ जुलै २०२६ रोजी न्हावे येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये वाहतूक प्रबोधन कार्यक्रम राबवला.



विद्यार्थी व शिक्षकांमध्ये लहान वयातच वाहतूक नियमांची जाणीव निर्माण व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.नवीमुंबई वाहतूक आयुक्तालयाने परिसरातील सर्वच शाळांना वाहतूक नियमांचे प्रबोधन करण्यासाठी शाळा दत्तक योजना सुरू केली आहे. न्हावाशेवा वाहतूक शाखेच्या हद्दीत एकूण १६ शाळा आहेत. प्रत्येक शाळा एका पोलीस अंमलदाराला दत्तक देण्यात आली असून नेमलेले अंमलदार नियमितपणे शाळेत जाऊन विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत आहेत.

या उपक्रमाअंतर्गत काल १३ जुलै २०२६ रोजी न्हावाशेवा वाहतूक शाखेतील पोलीस हवालदार संजय बोटे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली रयत शिक्षण संस्था न्यू इंग्लिश स्कूल न्हावे शाळा येथे भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेचे महत्त्व, झेब्रा क्रॉसिंगचा वापर, सिग्नलचे नियम, हेल्मेट व सीटबेल्टची आवश्यकता, तसेच सायकल व पादचारी सुरक्षा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.याशिवाय पो.हवालदार संजय बोटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनातून आवाहन केले. वाहतूक नियमांबाबत काही अडचण किंवा सूचना असल्यास बिनधास्तपणे सांगा, कारण तुम्हीच उद्याचे जबाबदार नागरिक असल्याचे सांगितले.

### पोलीस निरीक्षक प्रविण पांडे यांचे आश्वासक मार्गदर्शन | सरपंच हर्षदा मयेकर यांचा पुढाकार

## नागावच्या सुरक्षित पर्यटनासाठी ग्रामपंचायत अन् पोलीस एकत्र

**। नागाव । प्रतिनिधी ।**

नागावमधील पर्यटन व्यवसाय अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध व कायदेशीर चौकटीत राहावा, या उद्देशाने सरपंच हर्षदा मयेकर यांच्या पुढाकारातून ग्रामपंचायत नागाव व अलिबाग पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यटन व्यवसायिकांची महत्त्वपूर्ण बैठक नागाव ग्रामपंचायत सभागृहात उत्साहात पार पडली.





या बैठकीला नागाव हद्दीतील हॉटेल, लॉज, होमस्टे, रिसॉर्ट, वॉटर स्पोर्ट्स तसेच समुद्रकिनारी पर्यटनाशी संबंधित व्यवसायिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

बैठकीच्या प्रारंभी नागावचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर यांच्या हस्ते अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रविण पांडे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर पोलीस निरीक्षक प्रविण पांडे यांनी पर्यटन व्यवसाय करताना कायद्याच्या चौकटीत राहण्याचे महत्त्व, पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी घ्यावयाची काळजी, शासनाच्या नवीन नियमावली, आवश्यक परवानग्या, नोंदी व कायदेशीर जबाबदाऱ्या याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

पर्यटन व्यवसाय करताना नियमांचे काटेकोर पालन करून नागावची पर्यटनस्थळ म्हणून असलेली विश्वासार्हता अधिक वृद्धिंगत करण्याचे आवाहन त्यांनी केले. बैठकीदरम्यान उपस्थित व्यावसायिक व ग्रामस्थांनी विविध प्रश्न, अडचणी आणि शंका मांडल्या. त्या सर्व प्रश्नांना पोलीस निरीक्षक प्रविण पांडे यांनी अत्यंत संयमाने व समाधानकारक उत्तरे देत उपस्थितांचे समाधान केले. यावेळी त्यांनी नागावमध्ये येत्या महिनाभरात पोलीस चौकी सुरू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू असून ती लवकरच कार्यान्वित करण्यात येईल, असे आश्वासन दिले. या घोषणेचे उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.

या बैठकीस सरपंच हर्षदा मयेकर, उपसरपंच मंगल नागे, सदस्य निखिल मयेकर, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी, पोलीस पाटील, पोलीस अधिकारी, सर्कल अधिकारी तसेच नागावमधील पर्यटन व्यवसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीच्या शेवटी सरपंच हर्षदा मयेकर यांनी पोलीस प्रशासन, उपस्थित सर्व व्यावसायिक आणि ग्रामस्थांचे आभार मानत, ग्रामपंचायत व पोलीस प्रशासन यांच्या समन्वयातून नागावला अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि आदर्श पर्यटनस्थळ बनविण्यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले.

## पान १ वरुन

### पेण हादरले!

धागेदोऱ्यांच्या आधारे पोलिसांनी संशयित किरण भिकू वाघमारे याला ताब्यात घेतले.

मृत चिमुकलीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय, पेण येथे पाठविण्यात आला असून, शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. या प्रकरणाचा सर्व बाजूंनी सखोल तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

घटनेची गंभीरता लक्षात घेऊन रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुंद तसेच पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाचा आढावा घेतला. या अमानुष घटनेमुळे संपूर्ण पेण तालुक्यात हळहळ आणि संतापाचे वातावरण असून, आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## घाटबंदीचा विद्यार्थ्यांना फटका

येथील विद्यार्थ्यांनाही कापडे बुद्रुक येथील विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयात पोहोचण्यासाठी पायपीट किंवा खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे.

विशेष म्हणजे, संबंधित ठेकेदार कंपनीने कशेडी घाटातून एसटी वाहतूक सुरू करण्याइतका रस्ता सुरक्षित असल्याचे सांगितले असले, तरी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून याबाबत अधिकृत परवानगी न मिळाल्याने एसटी सेवा अद्याप सुरू झालेली नाही. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी कशेडी व आंबेनळी घाटमार्गावर स्थानिक पातळीवर एसटी सेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी जोर धरत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे स्थानिक पदाधिकारी अजय सलागरे यांनीही खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाकडे विद्यार्थ्यांच्या अडचणी मांडल्याची माहिती मिळाली आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे म्हात्रोळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. सुधाकर मोरेश्वर नाईक, २) श्री. बाळाराम मोरेश्वर नाईक व ३) श्री. सिताराम मोरेश्वर नाईक यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट/हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| म्हात्रोळी | २२६/१/२ | ०-७३-१० | १६.४३ |
| | | १-४१-३० | |
| | | **२-१४-४०** | |
| | | पो.ख. ०-१७-५० | |
| | | २-३१-९० | |

पैकी २ हे. ०७.६० आर एवढी मिळकत.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १५/७/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हौ.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

M/S Special Recovery and Sales Officer,
Through-Raigad District Co-Operative
Credit Societies Federation (Ltd) Alibag,
Add. "Krishna Mandir" Society, 101,
Above N.K.G.S.B. Bank, Maruti Naka, Alibag,
Tal.Alibag, Dist.Raigad-402201.
Phone No.8108404076/8698564076.

Ref. No.002/Zed Notice/S.R.O./156/2026 Date: 13/07/2026

**FORM "Z"**
**(see sub-rule (11(d-1) of rule 107)**

POSSESION NOTICE FOR IMMOVABLE PROPERTY

Whereas the undersigned being the Recovery Officer of the Raigad District Co-Operative Credit Societies Federation (Ltd) Alibag, Raigad, Name of Applicant, Mr. S.R.Gothankar under The Maharashtra Co- operative Societies Rules 1961 issued a demand notice dated 24/04/2024 calling upon the judgment debtor/ Guarantor.

Mr. S.R.Gothankar to repay the amount mentioned in the notice being Rs- 8,74,365/-( In Words Eight Lakh Seventy Four Thousand Three Hundred Sixty Five only + Int + cost of Progress) to repay the amount mentioned in the notice being Rs-8,74,365/-( In Words Eight Lakh Seventy Four Thousand Three Hundred Sixty Five only + Int+ cost of Progress) with date of receipt of the said notice and the judgment debtor/ Guarantor having failed to repay the amount the undersigned has issued a notice for attachment dated 06/12/2024 and attached the property described herein below.

The judgment debtor/ Guarantor having failed to repay the amount,notice is hereby given to the judgment debtor/ Guarantor and the public in general that the undersigned has taken symbolic possession of the property described herein below in exercise of powers conferred on her/him under rule 107(11)(d-2) if the Maharashtra Co-operative Societies Rules 1961 on his dated 19/12/2024 has refused to handover actual and peaceful possession to undersigned Special Recovery Officer.

The judgment debtor/Guarantor in particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property and any dealings with the property wil be subject to the charge of the JANSEVA NAGARI SAHAKARI PATHANSTHA LTD. an amount being Rs- 8,74,365/-(In Words Eight Lakh Seventy Four Thousand Three Hundred Sixty Five only + Int + cost of Progress) as on 14/03/2024 and interest thereon.

**DESCRIPTION OF THE IMMOVABLE PROPERTY**

| Sr. | Proprietor | Particular | area |
|---|---|---|---|
| 1 | Debtor- Mr.Kiran Prahlad Khandekar | Grampanchayat Varsoli Tal-Alibag, Dist- Raigad. Within the boundaries of Mauje Varsoli, Property No.1777 | Land Area 576 sq.ft., |

Place : Alibag.
Date : 13/07/2026.

sig/-
**Shri. S.R.Gothankar**
**Special Recovery Officer**
**Raigad District Co-Operative Credit Societies Federation (Ltd)**
**Alibag-Raigad.**

[redacted]

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे अडुळसे, ता.- सुधागड, जि.- रायगड येथील खालील वर्णनाची मालमत्ता, मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदीने विकत घेण्याविषयी, आमचे अशिलांनी त्यांच्याबरोबर बोलणी केली आहे.

| मालकाचे नाव | ग.क्र./भू.क्र | एकूण क्षेत्रफळ हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| पूजा प्रकाश सुर्वे | २२१/३ | ला. योग्य १-००-००<br>पो.ख. ०-२३-००<br>एकूण.१-२३-०० | ०.६५ |

तरी सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही वारसा हक्क, दान, बक्षीस, गहाण, साठेकरार, फरोक्त अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क अथवा अधिकार असल्यास किंवा सदर खरेदी बद्दल कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर योग्य कागदपत्रांसह लेखी हरकत द्यावी. उक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकतीच्या पुढील व्यवहाराबाबत बोलणी करून कार्यवाही पूर्ण केली जाईल व मागावून घेतलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहण नाहीत, याची नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. सोनाली गंगाधरे शहासने**
''सीता-सदन'' वाकण, पो.- पाटणसई,
ता.-रोहा, जि.-रायगड, ४०२१०६
मो.क्र.७७७५८९०४५५
advsonalishahasane@gmail.com

[redacted]

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमची अशिलानी यांनी मौजे-किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अजय अनंत म्हात्रे यांचेकडून खरेदी घेण्याबाबत बोलणी चालू आहेत. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| किहीम.<br>ता. अलिबाग<br>जि.रायगड | ३०९ | वरकस ०.१५.००<br>पो.ख ०.००.००<br>एकुण ०.१५.०० | ०.२३ |

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजारहित असल्याची व ती मिळकत कायस्वरूपी विकण्याचा पूर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जाती, शित, कर्जाच बोजा, जमिनकी, कुळहक्क, कब्जा वारसाहक्क, मालकी, एम.ओ. यू. करार, ताबे कब्जा वहीवादी, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारने हक्क अगर तक्रार / हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसाचे मुदतीत लेखी स्वरूपात प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर करावयात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडून दिला आहे. असे समजून, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार बोलणे सफल झाल्यास खरेदीखत नोंदणीकृत करून पूर्ण केले जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत यांची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १०/०७/२०२६
सही/-
पक्षकाराच्या मान्यतेची सही

**ॲड. सचिन सदानंद पाटील**
मु. ७६२ / ए / बी, आई बंगला, शिवसागर वसाहत,
कुरूळ ता. अलिबाग, जि. रायगड मो. नं. ९८८१६३७९२४
ई.मेल : sp3589166@gmail.com

## मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना
## १९१ पेण विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती
## जाहीर सूचना

**संदर्भ :-**

१. महसूल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक लवेसू २०२५/प्र.क्र.०२/पाणंद रस्ते दि.१४/१२/२०२५
२. महसूल व वनविभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन शुद्धीपत्रक क्रमांक: लवेसू २०२५/प्र.क्र.०२/ (E१४५२७१०) पाणंद रस्ते दि.१८/०२/२०२६
३. महसूल व वनविभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक: लवेसू-२०२५/प्र.क्र.०२ (६१४५२७१०) पाणंद रस्ते दि.१८/०२/२०२६

महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक लवेसू २०२५/प्र.क्र.०२/पाणंद रस्ते दि.१४/१२/२०२५ अन्वये रायगड जिल्हयाकरीता विधानसभा क्षेत्रातील मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना २०२६-२७ करीता दर निश्चित करण्यासाठी विधानसभा क्षेत्र निहाय यंत्रसामुग्रीचे (यंत्रसामुग्री इंधन मनुष्यबळ) प्रति तासिका दर ई-निविदाद्वारे खाजगी यंत्रसामुग्री धारकाकडून दर मागविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने निविदामध्ये प्राप्त न्युनत्तम दराला जिल्हास्तरीय समितीद्वारे प्राप्त मंजूरी सोबत जोडलेल्या सहपत्र क्र. १ मध्ये नमूद केलेले आहे.

महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन शुध्दीपत्रक क्र. लवेसू २०२५/प्र.क्र.०२ (E-१४५२७१०) / पाणंद रस्ते दिनांक २५ मार्च २०२६ अन्वये ''जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेले तांत्रिक अर्हता (Technical Qualification) व अंतिम केलेला प्रति तास दर (L1Rate ) (सहपत्र १ प्रमाणे) आधारभूत मानून कंत्राटदार, १९१ पेण विधानसभा क्षेत्रामध्ये काम करण्यास इच्छुक असेल त्या पात्रताधारक कंत्राटदाराने योग्य व आवश्यक दस्ताऐवजासह निविदा फि रूपये १०,०००/- चा धनाकर्ष (Demand Draft) व रूपये १५.०० लक्ष चा FDR "MUKHYAMANTRI BALIRAJA SHET PANAND RASTE YOJANA" यांच्या नावे जमा करून नामनिर्देशन (Empanelment) करीता आवेदन पत्र दिनांक १६/०७/२०२६ ते दिनांक ३०/०७/२०२६ या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेमध्ये उपविभागीय अधिकारी पेण, उपविभाग पेण, जि. रायगड या ठिकाणी मागविण्यात येत आहे.

**(प्रवीण ज्ञानू पवार)**
**उपविभागीय अधिकारी**
**पेण, उपविभाग पेण**

**क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/६५/८९२/२०२६**

### ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बुद्रुक

ता. माणगाव, जि. रायगड

**निविदा सूचना**

ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बुडुक खालील कामाकरिता जास्तीत जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदारा/ पुरवठादार कडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र | कामाचे/वस्तुचे नाव | कामाचे परिणाम (संख्या) | निधीचा स्त्रोत्र | रक्कम | काम पूर्ण कारावयाचा कालावधी | निविदा सादर करणेतचा अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | १% इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मुलामुलीना संगणक प्रशिक्षण देणे | १ | १५ वा वित्त आयोग २४/२५ ग्राप स्तर | ५००००/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | | |
| २. | सर्व शाळांना स्वच्छता विषयक साहित्य पुरविणे | १ | १५ वा वित्त आयोग २४/२५ ग्राप स्तर | ३००००/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | | |
| ३. | सर्व शाळांना खेळाचे साहित्य पुरविणे | १ | १५ वा वित्त आयोग २४/२५ ग्राप स्तर | ३६९५७/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | | |
| ४ | मेडिक्लोर घेणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | ४५०००/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | | |
| ५ | First and kit पुरविणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | १००००/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | | |
| ६ | कविलवहाळ बु.शाळेला संरक्षण भिंत बांधणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | ९९२५५/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ९९२ | २०० |
| ७ | कविलवहाळ बु.अंगणवाडी दुरूस्ती करणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | ५१७०२/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ५१७ | २०० |
| ८ | कविलवहाळ बु.पाणीपुरवठा टाकीला रंगरंगोटी करणे व पायऱ्या दुरूस्ती करणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | १२५०००/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | १२५० | २०० |
| ९ | कविलवहाळ बु.पाणीपुरवठा टाकीला कंपाऊड व पी.सी.सी.करणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | ५५०००/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ५५० | १०० |
| १० | कविलवहाळ कोंड विहिरीकडे जाणारा रस्ता करणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | १४३१९२/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | १४३१ | २०० |
| ११ | धनगरवाडी येथे अंतर्गत रस्ता करणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | १६७८३२/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | १६७८ | २०० |
| १२ | खिंड आ.वाडी शाळेला पाण्याची व्यवस्था करणे | १ | १५ वा वित्त आयोग २४/२५ ग्राप स्तर | ५८२३५/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ५८२ | १०० |
| १३ | कविलवहाळ बुद्रुक विहीर दुरूस्त करणे | १ | १५ वा वित्त आयोग २४/२५ ग्राप स्तर | ९३०६०/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ९३० | २०० |
| १४ | ग्रा.पं.हद्दीतील विहिरीना जाळ्या बसविणे | १ | १५ वा वित्त आयोग २४/२५ ग्राप स्तर | ९००००/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ९०० | २०० |
| १५ | धनगरवाडी विहीर दुरूस्ती करणे | १ | १५ वा वित्त आयोग २४/२५ ग्राप स्तर | ७०५०५/- | १ वर्ष | २२/०७/२०१६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ७०५ | २०० |
| १६ | उन्द्रेवाडी विहीर दुरूस्ती करणे | १ | १५ वा वित्त आयोग २४/२५ ग्राप स्तर | ७०४९५/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ७०४ | २०० |
| १७ | कविलवहाळ कोंड विहीर चौथरा बांधणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | ७३१९२/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ७३१ | २०० |
| १८ | आ.वाडी विहीर दुरूस्ती | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | ६९७८७/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ६९७ | २०० |
| १९ | बौद्धवाडी विहीर दुरूस्ती करणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | ६९७८७/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ६९७ | २०० |
| २० | कविलवहाळ कोंड अंगणवाडी शौचालय दुरूस्ती करणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | ४३०३३/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ४३० | १०० |
| २१ | कविलवहाळ खुर्द बौद्धवाडी स्मशानभूमीला शेड करणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | ९८१६४/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ९८१ | २०० |
| २२ | उन्द्रेवाडी शाळा दुरूस्ती करणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | ९८१६४/- | १ वर्ष | २२/०७/२०२६ | साय ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ९८१ | २०० |

**अटी व शर्ती**

१) प्राप्त निविदा दि. २३/०७/२०२६ रोजी स. ठीक ११.०० वाजता ग्रा.पं. कविलवहाळ बुद्रुक येथे मा. सरपंच यांच्या समक्ष उघडणेत येईल,
२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार मा. सरपंच कविलवहाळ बुद्रुक यांनी राखून ठेवला आहे.
३) प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील. मा. उपअभियंता सो. बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं.चे मा.सरपंच कविलवहाळ बुद्रुक यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा. पं.ने राखून ठेवला आहे.
४) काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांच्या निविदांचा विचार केला जाईल.

**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बुद्रुक**

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बुद्रुक**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक १) विनय श्रीपाद आठल्ये, २) विवेक श्रीपाद आठल्ये यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे-पूलाची वाडी तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ६ | ० | ०.४२.५० यापैकी ०.२८.३३ | ३.४४ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि. १५/०७/२०२६

खरेदीदारातर्फे वकील
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. गजवक्र रेसीडेन्सी, पाचवा मजला
फ्लॅट नं ५०४, कचेरी रोड कर्जत
ता.कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ८१४९२११३६६/७७०९१६०५६७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे वरई तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक विजय नरहरी अंधारे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक/ भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| २८/१ | ००.१४.८० | ००.२५ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :-१५ जुलै २०२६

**ॲड. शरद आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ.हौ.सो.लि.कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड-४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**रायगड -अलिबाग यांचे कार्यालय**

काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com
जा.क्र.जिउनि/गृह/मोफा क्र.११/मा.अभि./जाहीर नोटीस/ /सन २०२६/१३५८
दिनांक :- १०/०७/२०२६

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

श्री कृष्णकुंज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., मारुती मंदिरा समोर, सिटी सर्व्हे नं.४६६ बी/१ चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड, यांनी जमीनमालक १. सौ. वंदना साहेबराव राठोड, रा. गंगासागर सोसा. घुमकर वाडी, कलेक्टर ऑफिस जवळ,अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड, विकासक, २. मे सिद्धांत डेव्हलपर्स तर्फे प्रो.प्रा.सौ.वंदना साहेबराव राठोड, रा. गंगासागर सोसा. घुमकर वाडी, कलेक्टर ऑफिसजवळ, अलिबाग, ता.अलिबाग,जि.रायगड यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

रायगड जिल्ह्यातील ता.अलिबाग, अलिबाग सि.स.नं.- ४६६ बी/१, क्षेत्र ३७१.४१ चौ.मी.,

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक २३/०७/२०२६ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक- १०/०७/२०२६

सही/-
**(त.सं.पाटील)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी, मौजे वाडगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन नं. २२५, क्षेत्र ०-०८-३० (हे. आर) अधिक पोट खराबा ०-००-५० (हे. आर.) मिळून एकूण क्षेत्र ०-०८-८० (हे. आर.) आकार २.०६ (रू. पैसे) ही भातशेती मिळकत तिचे विद्यमान मालक श्रीमती स्मिता चंद्रकांत वाडेकर, सौ. वेदा विनोद पाटील, श्री. अमोल चंद्रकांत वाडेकर, यांचेकडून कायम स्वरूपी विकत घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी ती मिळकत निर्वेध असल्याची खात्री दिली आहे. तरी, सर्व लोकांस या नोटीसने असे कळविणेत येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीत विद्यमान मालकांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, वहिवाट, वगैरे, कोणताही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आंत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत ही निर्वेध आहे असे समजून विद्यमान मालकांबरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मग मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक देखील असणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग,
तारीख: १४.०७.२०२६.

**(ॲड. योगेश चंद्रकांत पार्टी)**
कार्या. ए-१०१/१११, त्रिमूर्ती प्लाझा,
बीचरोड, अलिबाग, जिल्हा रायगड.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# निवडक

## रेफ्री रॉब डीपरिंक यांचा मृत्यू



**दक्षिण आफ्रिका :** फिफा विश्वचषक २०२६ सुरू असतानाच फुटबॉल जगताला एकामागून एक मोठे धक्के बसत आहेत. दक्षिण आफ्रिकेचा २५ वर्षीय मिडफील्डर जेडन अ‍ॅडम्सच्या अचानक झालेल्या निधनाचा धक्का ताजा असतानाच, आता आणखी एका दु:खद बातमीने फुटबॉल विश्व हादरले आहे. फिफा विश्वचषकाच्या व्हीएआरफ टीमधून बाहेर काढण्यात आलेले नेदरलँड्सचे प्रसिद्ध रेफ्री रॉब डीपरिंक यांचे वयाच्या अवघ्या ३८ व्या वर्षी अचानक निधन झाले आहे. विश्वचषक सुरू होण्यापूर्वी त्यांच्यावर गंभीर आरोप झाले होते, जे नंतर पुराव्यांअभावी मागे घेण्यात आले. त्रॉब डीपरिंक यांना या विश्वचषकात व्हिडिओ असिस्टंट रेफ्री म्हणून महत्त्वाची जबाबदारी दिली जाणार होती. मात्र, स्पर्धा सुरू होण्याच्या अवघ्या महिनाभर आधी लंडनच्या मेट्रोपॉलिटन पोलिसांनी एका अल्पवयीन मुलाच्या लैंगिक शोषणाच्या आरोपाखाली त्यांना अटक केली होती. या वादामुळे त्यांचे नाव फिफाच्या अधिकृत यादीतून तातडीने हटवण्यात आले. तथापि, नंतरच्या तपासात त्यांच्याविरोधात कोणतेही ठोस पुरावे न मिळाल्याने हा खटला बंद करण्यात आला होता. डी टेलिग्राफशी बोलताना डीपरिंक यांनी म्हटले होते की, माझ्यावर खोटे आरोप झाले याचे मला प्रचंड दुःख आहे, मी सुरुवातीपासूनच पोलिसांना आणि फिफाला तपासात पूर्ण सहकार्य केले होते.

## फिफा २०३० ठरणार ऐतिहासिक




**अंटलांटा :** फिफा विश्वचषक २०३० मध्ये संघाची संख्या ४८ वरुन ६४ होण्याची शक्यता आहे. फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांनी २०३० च्या फिफा पुरुष विश्वचषकातील संघांची संख्या ६४ पर्यंत वाढवण्याच्या प्रस्तावावर गांभीर्याने विचार केला जाईल, असे महत्वपूर्ण वक्तव्य केले आहे. सध्याचा २०२६ चा विश्वचषक संपल्यानंतर संबंधित फिफा समित्या या विषयावर चर्चा करणार आहे. स्विस मीडिया आउटलेट ब्लू स्पोर्टला दिलेल्या मुलाखतीत इन्फँटिनो म्हणाले की, या विश्वचषकानंतर संबंधित समित्यांमध्ये २०३० च्या विश्वचषकात ६४-संघांना खेळवण्याच्या मुद्द्यावर निश्चितपणे चर्चा केली जाईल. प्रत्येक देशाला विश्वचषकात खेळण्याचे स्वप्न पाहण्याचा हक्क आहे. जगभरातील संघांचा स्तर सातत्याने सुधारत आहे. जर लहान देशांना विश्वचषकात खेळण्याची संधी मिळाली नाही, तर त्यांची पुढे जाण्याची प्रेरणा कमी होईल.अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेला २०२६ चा फिफा विश्वचषक हा ४८ संघांचा समावेश असलेला इतिहासातील पहिला विश्वचषक आहे.

## क्रीडा स्पर्धेत टाटा मोटर्सचा दबदबा!

**पुणे:** औद्योगिक क्रीडा संघटनेची सर्वसाधारण सभा शुक्रवारी (दि. ११) कपिला बिझनेस हॉटेल ढोले पाटील रोड पुणे -१ येथे सायंकाळी ७.३० वाजता संपन्न झाली. या सभेला पिंपरी-चिंचवड, चाकण, तळेगाव, पुणे येथील कामगार क्षेत्रातील विविध कंपन्यांचे खेळाडू, प्रतिनिधी व क्रीडा क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते. या पारितोषक वितरण समारंभाचे सूत्रसंचालन दत्ता शेळके, प्रास्ताविक, मागील वर्षाचा आढावा व आर्थिक अहवाल वाचन प्रदीप वाघ यांनी केले. प्रमुख पाहुणे अनुपकुमार यांचा सत्कार संघटनेचे अध्यक्ष गोल्फ खेळाडू राजेंद्र नागेशकर, उपाध्यक्ष नरेंद्र कदम, सचिव वसंत ठोंबरे यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन केले. २०२५२६ वर्षाच्या स्पर्धांमध्ये टाटा मोटर्सने ३१ गुण मिळवून सर्वसाधारण विजेतेपद तर बजाज ऑटो आकुर्डी संघाने २७ गुण मिळवून उपविजेतेपद पटकावले. टाटा मोटर्स कडून टाटा मोटर्स स्पोर्ट्स कमिटीचे अध्यक्ष शशिकांत कात्रे व टाटा मोटर्सचे एचआर व स्पोर्ट्स मॅनेजर नितीन कदम यांनी तर बजाज ऑटोकडून बजाज ऑटोचे एचआर व स्पोर्ट्स मॅनेजर अतुल काळोखे यांनी अनुपकुमार, राजेंद्र नागेशकर व वसंत ठोंबरे यांच्याकडून उपविजेतेपदाचा करंडक स्वीकारला. याच प्रसंगी संस्थेचे २०२६२७चे क्रीडा वेळापत्रक जाहीर करण्यात आले. याप्रसंगी स्पर्धेत प्रायोजकत्व देणाऱ्या १२ कंपन्यांना नरेंद्र कदम,विजय हिंगे, हरी देशपांडे, अतुल काळोखे, गिरीश गायकवाड, दुष्यंत गायकवाड, दयानंद प्रक्षाले, सचिन कांबळे, मंदार कुलकर्णी, दत्ता पाटील यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# एकदिवसीय सामने ४० ओव्हर्सचे होणार?




■ **आयसीसीच्या वार्षिक बैठकीत निर्णय**

■ **मॉरीशस देशाला मिळाली असोसिएट मेंबरशिप**

**| स्कॉटलँड | वृत्तसंस्था |**

नुकतीच स्कॉटलँड येथे आयसीसीची वार्षिक सभा पार पडली. ८ जुलै ते ११ जुलै दरम्यान ही सभा पार पडली. या बैठकीत अनेक मुद्दे उपस्थित केले गेले आणि त्यावर चर्चा देखील करण्यात आली. या बैठकीत चार प्रमुख गोष्टींवर चर्चा आणि काही महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

आयसीसीच्या या वार्षिक सभेत अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने एकदिवसीय सामने हे ५० ऐवजी ४० ओव्हर्सचे खेळवण्यावर चर्चा करण्यात आली. यावर बैठकीत विस्तृत चर्चा देखील करण्यात आली. मात्र बैठकीत कोणत्याच सदस्यांचे या मुद्द्यावर एकमत झाले नसल्याचे समोर आले. त्यामुळे सध्या तरी एकदिवसीय सामने आहे त्याच पद्धतीने सुरू राहणार असल्याचे समजते आहे.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेत एकूण ९ संघ सहभागी होतात. मात्र या आयसीसीच्या बैठकीत ९ ही संख्या वाढवून १२ करण्यावर चर्चा झाली. यामध्ये अफगाणिस्तान, आयर्लंड आणि झिम्बाब्वेचा समावेश करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. मात्र यामध्ये सकारात्मक तोडगा निघू शकला नाही. त्यामुळे सध्या डब्ल्यूटीसीमध्ये ९ संघ सहभागी असणार आहेत.

या बैठकीत अमेरिका क्रिकेट आणि कॅनडा क्रिकेट यांच्यावरील निलंबन मागे घ्यायचे का अशी चर्चादेखील करण्यात आली. मात्र आयसीसीने त्यांच्यावरील निलंबन कायम ठेवले आहे. अंतर्गत प्रशासकीय आणि व्यवस्थापकीय वाद न सुटल्यामुळे आयसीसीने हा निर्णय घेतला आहे. मॉरिशस देशाला देखील आयसीसीने असोसिएट मेंबरशिप म्हणजेच सहयोगी सदस्यत्व बहाल केले आहे. मॉरिशसच्या समावेशानंतर आता आयसीसीच्या एकूण सदस्य देशांची संख्या १११ वर पोहोचली आहे, ज्यामध्ये १२ पूर्ण वेळ सदस्य आणि ९९ सहयोगी सदस्य आहेत.

आपल्या पत्रात, सीटीआयने ४ जुलै २०२६ रोजी इंग्लंडमधील मँचेस्टर येथील ओल्ड ट्रॅफर्ड येथे खेळल्या गेलेल्या भारत आणि इंग्लंड यांच्यातील दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्याचा संदर्भ दिला आहे. संस्थेनुसार, सामन्याच्या षटकांच्या मधल्या वेळेत, जेव्हा लाखो लोक आपल्या कुटुंबासोबत थेट सामना पाहत होते, तेव्हा ड्युरेक्स कंडोमची एक जाहिरात प्रसारित करण्यात आली होती. वादग्रस्त असणाऱ्या जाहिरातींच्या प्रसारणावर बंधने आणण्याबाबत आयसीसीच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. वादग्रस्त जाहिरातींचे प्रसारण न करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

## डॉन अ‍ॅथलिट्सची आळंदी ते पंढरपूर अनोखी धाववारी




**| पनवेल | प्रतिनिधी |**

वारकरी संप्रदायाची परंपरा, श्रद्धा आणि आधुनिक फिटनेस यांचा सुंदर संगम घडवणारा एक अनोखा उपक्रम पनवेलमधील डॉन अ‍ॅथलिट्स या मॅरेथॉन प्रशिक्षण संस्थेने हाती घेतला आहे. संस्थेच्या वतीने आळंदी ते पंढरपूर साधारणपणे २२० किलोमीटर चे अंतर चक्क धावत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले असून या उपक्रमाला धावपटूंकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

या धाववारीचे नियोजन करण्यामध्ये पनवेलचे रहिवासी माधव मदरून आणि संजय मोतलिंग तसेच खारघरच्या अश्विनी सोनावणे यांचा विशेष सहभाग आहे. ही धाववारी एकूण पाच टप्प्यांत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यामध्ये आळंदी ते जेजुरी (६० किमी), जेजुरी ते फलटण (५२ किमी), फलटण ते नातेपुते (४० किमी), नातेपुते ते टप्पा (४७ किमी) आणि टप्पा ते पंढरपूर (२१ किमी) असा प्रवास धावत पूर्ण केला जाणार आहे.

या अनोख्या वारीसाठी पनवेल येथून ११ जुलै २०२६ रोजी प्रस्थान करण्यात आले असून १७ जुलै २०२६ रोजी पंढरपूर येथे वारीचा समारोप होणार आहे. या उपक्रमात डॉन अ‍ॅथलिट्स क्लबचे सुमारे ३५ धावपटू प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात सहभागी झाले आहेत.

## अलिबागच्या रुद्रा विनय पिळणकरचा दिल्लीत डंका



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

दिल्ली येथे पार पडलेल्या चौथ्या एमजेएफआय राष्ट्रीय लाठी व दांडपट्टा स्पर्धेमध्ये अलिबागच्या रुद्रा विनय पिंळणकर हिने महाराष्ट्रासाठी तीन सुवर्णपदक पटकावून अलिबागचे व महाराष्ट्राचे नाव संपूर्ण देशभरात उंचावले.

दहा वर्षाखालील मुलींच्या गटात लाठी खेळात तेलंगणा व उत्तर प्रदेशच्या खेळाडूंना अंतिम फेरीत मात करत लाठी खेळात एकमलाठीप्रकारातएकसुवर्णपदक व अटॅक अँड डिफेन्स या प्रकारात एक सुवर्णपदक असे लाठी खेळात दोन सुवर्णपदके पटकावली. तसेच दांडपट्टा खेळात महाराष्ट्रासाठी खेळत दहा वर्षाखालील मुलींच्या गटात तेलंगणा व उत्तर प्रदेशच्या खेळाडूंना अंतिम फेरीत मात करत एक सुवर्णपदक पटकावले. रुद्रा विनय पिळणकरचे संपूर्ण क्षेत्रातून कौतुक होत आहे. रुद्राला या खेळामध्ये प्रियंका संदेश गुंजाळ व वेदांत संदेश सुर्वे, सिद्धार्थ अशोक पाटील यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

## 'वर्ल्ड कप वूडबॉल' स्पर्धेसाठी
## डॉ. हेमंत पयेर यांची पंच म्हणून निवड



**| म्हसळा | प्रतिनिधी |**

मलेशियातील पर्लीस येथे २४ ते ३० जुलै २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या १० व्या वर्ल्ड कप वूडबॉल अजिंक्यपद स्पर्धे साठी डॉ. हेमंत पयेर यांची अधिकृत पंच म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे रायगड जिल्ह्यासह भारतीय वूडबॉल क्षेत्रासाठी हा अभिमानाचा क्षण मानला जात आहे.

डॉ. हेमंत पयेर हे वूडबॉल या खेळातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू असून त्यांनी विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. उत्कृष्ट खेळाडू म्हणून ओळख निर्माण केल्यानंतर त्यांनी २०२४ मध्ये चीन येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय पंच पात्रता परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत पंच म्हणूनही आपली गुणवत्ता सिद्ध केली. सध्या ते भारतीय वूडबॉल संघटनेच्या तांत्रिक समितीचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

वर्ल्ड कपसारख्या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत अधिकृत पंच म्हणून झालेली त्यांची निवड ही भारतीय वूडबॉलच्या वाढत्या आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेची साक्ष असल्याचे मानले जात आहे.

या यशामागे भारतीय वूडबॉल संघटनेचे अध्यक्ष आशिष देशमुख, उपाध्यक्ष किशोर बागडे, महासचिव अजय सोनटक्के, खजिनदार डॉ. प्रविण मानवटकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अ‍ॅड. सुदीप मानवटकर तसेच सहसचिव देवांग शहा आणि सागर सावंत यांचे मार्गदर्शन लाभल्याची भावना डॉ. हेमंत पयेर यांनी व्यक्त केली.

डॉ. हेमंत पयेर यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल रायगड जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी, विविध क्षेत्रातील मान्यवर, वूडबॉल खेळाडू आणि क्रीडा संघटनांनी त्यांचे अभिनंदन करत वर्ल्ड कप स्पर्धेतील यशस्वी कामगिरीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

## पुरस्कारांसाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

**| मुंबई | प्रतिनिधी |**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या अधिपत्याखालील जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयामार्फत जिल्हास्तरीय क्रीडा पुरस्कारांसाठी ३० सप्टेंबर पर्यंत अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी सायली जाधव यांनी केले आहे. खेळाडू पुरस्कारासाठी अर्जदाराने पुरस्कार वर्षासह मागील पाच वर्षांपैकी किमान दोन वर्षे संबंधित जिल्ह्याचे मान्यताप्राप्त स्पर्धांमध्ये प्रतिनिधित्व केलेले असावे. राज्य, राष्ट्रीय, शालेय आणि केंद्र शासनामार्फत आयोजित स्पर्धांमधील मागील पाच वर्षांतील कामगिरीपैकी तीन वर्षांच्या कामगिरीचा विचार पुरस्कारासाठी केला जाणार आहे.

## टेबल टेनिस स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला.




नवशिक्या मुलींमध्ये प्रथम इनाक्षी प्रुस्टी, द्वितीय अनुष्का जाधव, तृतीय: स्नेहल जाधव, तृतीय: आध्या आनंद, नवशिक्या मुलांमध्ये प्रथम जस्तेज सिंह, द्वितीय श्रेसय पाठक, तृतीय मानस वर्तक, तृतीय निर्माण कांबळे, ११ वर्षांखालील मुलींमध्ये प्रथम मीनाक्षी प्रुस्टी, द्वितीय स्नेहल जाधव, ११ वर्षांखालील मुलांमध्ये प्रथम: विहान पुरोहित, द्वितीय रियान म्हात्रे , १३ वर्षांखालील मुलींमध्ये प्रथम धृती गोयल, द्वितीय अध्या आनंद, १३ वर्षांखालील मुलांमध्ये प्रथम अश्विक चव्हाण, द्वितीय विहान पुरोहित, १५ वर्षांखालील मुलींमध्ये प्रथम त्रिशा पावशे, द्वितीय रिया ठाकूर, १५ वर्षांखालील मुलांमध्ये प्रथम नील राठोड, द्वितीय अद्वित पाटील, १७ वर्षांखालील मुलींमध्ये प्रथम त्रिशा पावशे, द्वितीय देवी उन्मेष मोरे, १७ वर्षांखालील मुलांमध्ये प्रथम अद्वित गुप्ता, द्वितीय रेयांश शाहू, १९ वर्षांखालील मुलींमध्ये प्रथम रिया ठाकूर, द्वितीय ईश्वरी शितोळे, १९ वर्षांखालील मुलांमध्ये प्रथम अद्वित गुप्ता, द्वितीय नील राठोड, पुरुष खुला गटामध्ये प्रथम सागर कुलकर्णी, द्वितीय लोकेश पाटवा, तृतीय शामल डेबार्मा, तृतीय मनीश सकलानी, महिला खुला गटामध्ये प्रथम निकिता माने, द्वितीय शिरीन काळे, पुरुष व्हेटरन्स या प्रकारात प्रथम क्रमांक मनीष सकलानी यांनी तर द्वितीय क्रमांक विजय यादव यांनी पटकावला.

## नीरू धांडाची 'सुवर्ण' कामगिरी



■ **विश्वचषकात रचला इतिहास**

■ **महिलांच्या ट्रॅपमध्ये जिंकले पहिले पदक**

**| लोनाटो | वृत्तसंस्था |**

स्टार नेमबाज नीरु धांडाने शनिवारी ११ जुलै रोजी इटलीतील लोनाटो येथे झालेल्या असलेल्या आयएसएसएफ शूटिंग शॉटगन विश्वचषक स्पर्धेतील महिलांच्या ट्रॅप प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले.

नीरुने आपल्या कारकिर्दीतील पहिले वैयक्तिक आयएसएसएफ विश्वचषक सुवर्णपदक जिंकले. हरियाणाच्या नीरुने विश्वचषक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत देशाला गौरव मिळवून दिला. यासह ट्रॅप शूटिंगमध्ये सुवर्णपदक जिंकणारी ती पहिली भारतीय महिला ठरली आहे. नीरुने २७ नेम अचूक लागले, तर २०२२ ची विजेती फ्रान्सची कॅरोल कॉर्मे नियर हिला २५ नेम लागल्याने रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. गेल्या वर्षी आशियाई चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक आणि या वर्षी आयएसएसएफ विश्वचषक मिश्र सांघिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकणाऱ्या २६ वर्षीय नीरूच्या कारकिर्दीतील ही सर्वात मोठी कामगिरी आहे.

विद्यमान राष्ट्रीय विजेती नीरूने पात्रता फेरीत उत्कृष्ट कामगिरी करत १२५ पैकी १२१ गुण मिळवून पदकाच्या लढतीत आपले स्थान निश्चित केले. आठ जणांच्या अंतिम सामन्यात तिने सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवले. अंतिम सामना शेवटच्या शॉटपर्यंत रोमांचक राहिला. शेवटच्या दोन शॉट्सपूर्वी दोन्ही नेमबाज प्रत्येकी २५ गुणांवर बरोबरीत होते. दबावाच्या क्षणी कॉर्मेनियरचा नेम चुकला, तर नीरूने संयम दाखवत ३० पैकी २७ लक्ष्ये भेदून सुवर्णपदाकावर आपले नाव कोरले.

**जेडेन लेनोक्सचे १९ धावांत ५ बळी | ३ सामन्यांची एकदिवसीय मालिका १-१ ने बरोबरीत**

## न्यूझीलंडने वेस्ट इंडिजला ५ गडी राखून हरवले

**| गयाना | वृत्तसंस्था |**

न्यूझीलंडने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात वेस्ट इंडिजचा ५ गडी राखून पराभव केला आहे. गयाना येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यात, जेडेन लेनोक्सच्या पाच विकेट्सच्या जोरावर न्यूझीलंडने वेस्ट इंडिजला केवळ १३८ धावांत गुंडाळले.

वेस्ट इंडिज संघाने आपले शेवटचे १० गडी केवळ ७५ धावांत गमावले. १३९ धावांच्या छोट्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंड संघाने ५ गडी गमावून सहज विजय मिळवला. या विजयासह न्यूझीलंडने ३ सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली आहे.

न्यूझीलंडचा डावखुरा फिरकीपटू जेडेन लेनोक्स या सामन्याचा सर्वात मोठा नायक ठरला. त्याने केवळ १९ धावांत ५ बळी घेतले. ही त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी आहे. यापूर्वी खेळलेल्या ६ एकदिवसीय सामन्यांमध्ये लेनोक्सला कधीही २ पेक्षा जास्त बळी घेता आले नव्हते. त्याचे पहिले चार बळी क्लीन बोल्ड स्वरूपात आले.



या शानदार कामगिरीसह, लेनोक्स न्यूझीलंडच्या पुरुषांच्या एकदिवसीय इतिहासातील तिसरा सर्वोत्तम आकडेवारी नोंदवणारा फिरकीपटू बनला आहे. या यादीत पहिल्या क्रमांकावर ईश सोढी (६/३९) आणि दुसऱ्या क्रमांकावर डॅनियल व्हिटोरी (५/७) यांची नावे आहेत.

नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या वेस्ट इंडिजची सुरुवात अत्यंत शानदार झाली होती. सलामीवीर जॉन कॅम्पबेल आणि अकीम ऑगस्टे यांनी पहिल्या विकेटसाठी ६३ धावांची मजबूत भागीदारी केली. पॉवरप्लेच्या शेवटी दोघांनी वेगाने धावा केल्या, पण त्यानंतर न्यूझीलंडच्या फिरकीपटूंनी सामन्याचे चित्र बदलले.

मायकेल ब्रेसवेलने पहिले यश मिळवून दिले, त्यानंतर वेस्ट इंडिजने सलग विकेट गमावल्या. संघ १३८ धावांवर सर्वबाद झाला. जॉन कॅम्पबेलने सर्वाधिक ४३ धावा केल्या. अमीर जांगूने २० धावांची खेळी केली, तर इतर कोणताही फलंदाज २० धावांपर्यंत पोहोचू शकला नाही.

कर्णधार मिचेल सँटनरनेही दोन महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या. त्याने जॉन कॅम्पबेल आणि मागील सामन्याचा हिरो कीसी कार्टीला क्लीन बोल्ड केले.न्यूझीलंडच्या स्पिनर्सनी या सामन्यात एकूण ९ विकेट्स घेतल्या. वनडे इतिहासात एका डावात न्यूझीलंडच्या स्पिनर्सची ही सर्वोत्तम कामगिरी आहे. सुरुवातीच्या स्पेलनंतर जेकब डफी आणि मॅथ्यू फिशरच्या जागी संपूर्ण डावात स्पिनर्सनी गोलंदाजी सांभाळली.

## राहुल द्रविड होणार इंग्लंडचे प्रशिक्षक?

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

अति आक्रमक पद्धतीने टेस्ट मॅच खेळण्याची पद्धतच बदलून टाकणारे प्रशिक्षक ब्रेंडन मॅक्युलम यांची इंग्लंडच्या प्रशिक्षकपदावरून गच्छंती करण्यात आली. मॅक्युलम यांच्या टोपणनावाने प्रसिद्ध झालेल्या बॅझबॉल प्रणालीवर उतारा म्हणून राहुल द्रविड यांची संयमी शैली उतारा ठरणार का? कारण इंग्लंडच्या टेस्ट प्रशिक्षकपदासाठी राहुल द्रविड यांचं नाव चर्चेत आहे.



द्रविड यांनी निवृत्तीनंतर बंगळुरूस्थित नॅशनल क्रिकेट अकादमीचे प्रमुखपद भूषवलं. भारतीय अ संघाचे प्रशिक्षक म्हणून काम पाहिले. आयपीएलमधल्या राजस्थान रॉयल्स संघाचं प्रशिक्षकपद सांभाळलं. यानंतर द्रविड यांनी भारतीय क्रिकेट संघाच्या प्रशिक्षकपदाची अवघड जबाबदारी हाताळली. द्रविड यांच्या कार्यकाळात भारतीय संघाने टी २० वर्ल्डकपच्या जेतेपदावर कब्जा केला. इंग्लंडच्या टेस्ट प्रशिक्षकपदासाठी राहुल द्रविड यांच्यासह अँडी फ्लॉवर आणि रिचर्ड डॉसन यांची नावंही चर्चेत आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)